११५८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ८५२५.

...स्तकमाला

...पुस्तक ...वें

# दादाभाईंचा निरोप

विनायक महादेव सुस्कुटे

१९१७

९८९

किंमत एक आणा

# प्रस्तुत पुस्तकाची जरूरी

ब्रिटिश राज्यसंस्थापनेनंतर सुमारें एक शतक लोट-
ल्यावर सन १९०६ सालीं हिंदुस्थानचे राजकीय भीष्म-
पितामह दादाभाई नवरोजी यांनीं कलकत्त्यास उदयोन्मुख
हिंदी राष्ट्राच्या मनोभूमींत स्वराज्यवृक्षाचें बीजारोपण केलें
व हिंदी जनतेस या बीजाचा मोठा भव्य वृक्ष होऊन त्या
वृक्षाच्या सुरम्य सुखदायी छायेचा लाभ भोगावयास
मिळून स्वातंत्र्याच्या कल्पवृक्षाखालीं राहणाऱ्या स्वतंत्र
लोकांच्या परिस्थितीचीं सुखस्वप्नेंहि पडूं लागलीं. अर्थात्
अखिल हिंदी जनतेस ह्या बीजरूप भावी वृक्षाचें जतन
जीवापाड करणें जरूर वाटूं लागलें; इतकें कीं, त्याचें संर-
क्षण कसेंहि करून केलेंच पाहिजे, म्हणून आपआपसां
यादवीहि कांहीं काळ माजून राहिली. ह्या संधीचा फ
घेऊनच हिंदी राष्ट्रभूमींतील सर्व द्रव्यरस आपणच
इच्छिणाऱ्या हिंदी राजकीय आकांक्षेच्या शत्रूंनी
अजीबात उपटून टाकण्याचा प्रयत्न केला.
लोकांच्या अपरिमित स्वार्थत्यागानें तो प्रसंग

प्रस्तुतचा प्रस्तावनालेख ज्या वेळीं लिहिला जात आहे त्या वेळीं सुद्धां हिंदुस्थानच्या सर्व राजकीय आकांक्षा ज्या एका गोष्टींत केंद्रीभूत झाल्या आहेत, त्या स्वराज्याच्या गड्ड्यावर दुसरा जबरदस्त हल्ला चढविण्यांत येत आहे. ह्या वेळींहि हा स्वराज्यरूपी रथ इच्छित स्थळीं जावा म्हणून त्याच्या मार्गावरील खांचखळगे भरून काढण्याकरितां स्वात्मार्पण करण्यास हिंदी लोक तयार आहेत.

परमपूज्य दादाभाईनीं 'स्वराज्य' ह्या एकाच शब्दांत हिंदी लोकांच्या राजकीय आकांक्षा ग्रथित केल्या. 'स्वराज्य' हें अंतिम ध्येय राष्ट्रापुढें मांडून तत्प्राप्त्यर्थ ज्या ज्या पायऱ्या आपणांस चढाव्या लागणार आहेत त्यांचेंहि दिग्दर्शन दादाभाईनीं अध्यक्ष या नात्यानें केलेल्या आपल्या भाषणांत उत्तम रीतीनें ग्रथित केलें आहे. 'जबाबदार राज्यपद्धति' अगर 'लोकसत्ताक प्रातिनिधिक राज्यपद्धति' हा स्वराज्याचा प्राण आहे असें मला वाटतें. 'जबाबदार राज्यपद्धति' अगर 'लोकसत्ताक प्रातिनिधिक राज्यपद्धति,' हे शब्दसमुच्चय जरी निरनिराळे दिसतात तरी त्यांचा अर्थ एकच आहे.

कारभार चालविणारी व्यक्ति अगर व्यक्तिसमुच्चय

कायदे करणाऱ्या लोकप्रतिनिधींना जबाबदार पाहिजे, हें तत्त्व प्राचीन कालापासून एका नाहीं तर दुसऱ्या रूपानें आर्यभूमींत रूढ आहे. आर्यावर्तातील पूर्वकालीन एकतंत्री राज्यपद्धतीमध्यें सुद्धां सर्व राजे, महाराजे व अधिराजे आपलीं राज्यें ऋषिप्रणीत स्मृतिग्रंथांच्या अनुरोधानें चालवीत असत. व हें ऋषिमंडळ वारंवार या राजांचेकडे जाऊन त्यांना त्यांच्या राज्याच्या सुव्यवस्थेबद्दल जाब विचारी. राजा जर यथान्याय यथास्मृति वागत नसेल तर त्या राजांना ह्या तपोनिष्ठ ऋषींकडून नानारूपानें शासन केलें जाई. म्हणूनच प्राचीन इतिहासांत राजाराजांचीं कितीहि भांडणें झालीं तरी तीं व्यक्तिनिष्ठ असत, व कोणत्याहि परिस्थितींत प्रजेची हेळसांड राजाकडून होत नसे. अगदीं आधुनिक काळीं सुद्धां शिवाजीमहाराजांच्या स्वराज्यांत अगर इंग्रजांच्या कट्टया द्वेष्टया टिपूचे राज्यांत सुद्धां त्यांची प्रजा सुखी होती, असें इंग्रज इतिहासकारांनींच लिहून ठेवलें आहे. याचें कारण इतकेंच कीं, राजांच्या वर ह्या ऋषींचा अगर निरनिराळ्या राज्यांतील निःस्पृह व निरिच्छ अशा लोकांचा दाब असे. व लोकप्रतिनिधींच्या अभावाची उणीव निःस्पृहता व

निरिच्छता भरून काढी. खरोखर राज्यें कायद्याचींच असावीं. पण हे सर्व कायदे अगर नियम एक तर जगाच्या कल्याणाकरितांच ज्यांचा जन्म अशा ऋषींनीं करावे अगर स्वतःवर राज्य कोणीं व कसें चालवावें हें ठरविण्याचा जन्मसिद्ध हक्क ज्यांचा आहे अशा जनतेनें अगर त्यांच्या प्रतिनिधींनींच केले असले पाहिजेत. म्हणजे प्रचलित राजकीय शास्त्रभाषेंत बोलावयाचें म्हणजे राज्यकारभार प्रत्यक्ष चालविणारे अधिकारी हे मालक नसून खरोखर मालक असणाऱ्या प्रजेचे नोकर असले पाहिजेत. म्हणजेच त्यांना जबाबदार राज्यपद्धति मिळाली असें म्हणता येईल. सर्व लोकांना एकदम राज्य करणें अशक्य आहे, म्हणूनच त्यांना आपल्या प्रतिनिधींमार्फत राज्य चालविणें जरूर असतें. आपले प्रातिनिधि योग्य व उत्तम गृहस्थ निवडणें एवढेंच काम प्रजेकडे असतें व यालाच जबाबदार राज्यपद्धति अगर लोकसत्ताक प्रातिनिधिक राज्यपद्धति असें नांव आहे.

दादाभाईनीं १९०६ सालीं स्वराज्याचें निशाण उभारल्यानंतर दहा वर्षांनीं १९१६ सालीं अखिलभारतीय मुसलमान संघाच्या अनुमतानें राष्ट्रीय सभेनें जी स्वराज्ययोजना तयार केली ती संपूर्ण स्वराज्याची पहिली पायरी

व्हावी, अशीच तयार केली आहे. व त्यांत कायदेकौन्सिलमध्यें पास झालेले ठराव दोन वर्षांनीं दोन वेळां पास झाल्यावर कां होईना पण राज्याधिकाऱ्यांना बंधनकारक झालेच पाहिजेत असा जो नियम आहे, तोच 'जबाबदार राज्यपद्धतीचा' पहिला हप्ता होय. लखनौ येथें १९१६ त हिंदू व मुसलमान या दोन प्रमुख संघांचे व इतर लहान लहान जातिसमूहांचे सर्व शहाणेसुरते पुढारी एकत्र जमले होते व त्यांनींच राष्ट्रीय सभेमध्यें स्वराज्याची वरील योजना पसार करून राष्ट्रीय सभेच्या निरनिराळया कमीट्या व स्वराज्यसंघ यांना वरील योजना अंमलांत यावी म्हणून लोकमत सुशिक्षित करण्याची आज्ञा दिली. व आनंदाची गोष्ट ही कीं, ह्या राष्ट्रसभेच्या आज्ञेनुसारच स्वराज्यसंघ आपलें काम चोख रीतीनें बजावीत आहेत.

परमपूज्य दादाभाईनीं आपल्या भाषणांत 'स्वराज्या'-संबंधीं सर्व साधक बाधक मुद्दे स्पष्ट रीतीनें युक्तिसिद्ध केले आहेत. आम्ही हिंदी प्रजानन ब्रिटिश नागरिक आहों. (१) जन्मसिद्ध हक्क, (२) वचनदत्त हक्क, (३) पुनरुज्जीवनाचा नियम, (४) ब्रिटिशांची सदसद्विवेकबुद्धि यांमुळें या गोष्टीबद्दल वाद नाहीं. तेव्हां आम्हांस त्यांच्याच-

सारखे सर्व हक्क मिळाले पाहिजेत. ( १ ) सरकारी नोकरींत हिंदी लोकांचा प्रवेश, ( २ ) प्रातिनिधिक सत्ता, ( ३ ) जमाखर्चाची न्याय्य वांटणी वगैरे हक्क आम्हांस दिलेच पाहिजेत, अशी दादाभाईंची मागणी आहे; व याच मागणीस दादाभाईंनीं 'स्वराज्य' असें गोड दिलें नांव आहे.

"चळवळ करा, सारखी चळवळ करा; हिंदुस्थानांत व इंग्लंडमध्यें सारखी चळवळ करा" अशी दादाभाईंनीं तुतारी फुंकली, आणि सनदशीर व कायदेशीर चळवळीची दिशा दाखवून 'स्वराज्य' हिंदुस्थानास खास मिळेल अशी आपली दृढ आशा प्रगट केली आहे. व ती खास खरी होणार यांत शंका नाहीं.

एक गोष्ट मात्र खरी कीं, सनदशीर चळवळीची कड अद्याप आपण पोंचविली नाहीं. हिंदुस्थानांतील सर्व प्रजाजनांनीं एकमतानें व एकसमयावच्छेदानें हिंदुस्थानांत व विलायतेंत आपली चळवळ चालविली, तर यश खास मिळेल. प्रथम मागणी, नंतर चळवळ, नंतर तीव्र मतप्रदर्शन, नंतर निःशस्त्र प्रतिकार अशा राजकीय सनदशीर चळवळीच्या निरनिराळ्या चढत्या पायऱ्या आहेत. पैकीं तीन पायऱ्या आपण चढलों आहों. चवथी पायरी

लवकरच चढावी लागेल, असा संभव दिसतो.

परमपूज्य दादाभाईंचा हाच निरोप आहे. व हा निरोप पुनः एकवार सर्व मराठी वाचकांना सांगून रा. विनायक-राव भुसकुटे यांनीं चालू 'स्वराज्या 'च्या चळवळीस मोठीच मदत केली आहे त्याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे. प्रत्येक स्वराज्यवाद्यानें हा निरोप एकवार—पण एकवारच कां ?—शक्य तितक्या वेळ वाचावा कारण, दादा-भाईच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे खरोखरच 'राष्ट्रीय सर्व आपत्तींना स्वराज्य हा एकच व मुख्य उपाय आहे.'

पुणें, केसरी ऑफीस
२०-६-१९१७ } **दामोदर विश्वनाथ गोखले.**

# दादाभाईंचा निरोप

"स्वराज्याची तहान सुराज्यानें कधींहि भागणार नाहीं"

(सर हेनरी कँबेल बॅनरमन २३।११।१९१५)

"आमच्या राष्ट्राचा थोरपणा, त्याचें सामर्थ्य आणि त्याची महत्त्वाकांक्षा यांच्या मुळाशीं राजकारण हेंच आहे असेंच माझें म्हणणें आहे."

(मि. जॉन मोर्ले, किंग्ज हॉल, हॉलबोर्न ४।६।१९०१)

"राष्ट्राच्या सांपत्तिक बाबींत जर तुम्ही अन्यायानें ढवळाढवळ कराल, तर तुम्ही आपल्या राष्ट्राचें जीवित, अंतःकरण, व मर्म यांच्या अस्तित्वावरच घाला घालीत आहां असें पक्कें समजा."

(मि. मोर्ले फ्री-ट्रेड हॉल मँचेस्टर १९।१०।१९०३)

हिंदी राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षत्वाचा मान मला तिसऱ्यांदा देऊन आपण जो माझा गौरव केलांत याबद्दल मी आपला फार आभारी असून मजवर सोंपविलेलें काम पार पाडण्याकरितां तुम्ही मला अंतःकरणापासून मदत कराल अशी मला आशा आहे.

राष्ट्रीय सभा वयांत आल्यानंतर भरणारें हें या सभेचें पहिलेंच अधिवेशन आहे. आणि या वेळींच हिंदी लोकांची सद्यःस्थिति काय आहे व भविष्यत्कालीं कोणत्या प्रकारानें त्यांची उन्नति व्हावी, हें ठरविण्याची हीच योग्य वेळ आहे.

या महत्त्वाच्या गोष्टीचा विचार करतांना गत गोष्टीं-बद्दल रडगाणें गात बसण्याची माझी इच्छा नसून, फक्त देशाच्या भविष्यत्कालासंबंधानेंच मी विचार करणार आहें.

राष्ट्रीय सभेचें कार्य दोन प्रकारचें आहे:—

पहिलें व अतिशय महत्त्वाचें कार्य म्हणजे यापुढें हिंदु-स्थानची राज्यपद्धति कोणत्या धोरणावर व तत्त्वावर चालावी याचा विचार करणें हें होय.

दुसरें म्हणजे हिंदुस्थानांत सध्यां चालू असलेल्या राज्य-कारभारावर नजर ठेवणें, व वर दर्शविल्याप्रमाणें देशाच्या राज्यपद्धतींत सर्वस्वीं बदल होऊन देशाच्या राज्यकारभा-राचें धोरण योग्य तत्त्वावर ठरविण्यांत येईपर्यंत सध्यांच्या राज्यकारभाराच्या निरनिराळ्या खात्यांत वेळोवेळीं योग्य सुधारणा व फरक घडवून आणणें हें होय.

भविष्यत्कालीं हिंदुस्थानचें राज्य कोणत्या तत्त्वावर व धोरणावर चालविण्यांत यावें या कांग्रेसच्या पहिल्या कामा-

संबंधानेंच आजच्या माझ्या भाषणांत मुख्यत्वेंकरून मी विचार करणार आहें.

ब्रिटिश साम्राज्यांत हिंदी लोक कोणत्या नात्यानें ओळखले जातात ? ते ब्रिटिश नागरिक आहेत कीं नाहींत हा माझा पहिला प्रश्न आहे; आणि माझें म्हणणें, ते ब्रिटिश नागरिक असून ब्रिटिश नागरिकाला असणारे हक्क संपादन करण्याचा त्यांना हक्क आहे.

आम्ही ब्रिटिश नागरिक आहों असें हक्कानें म्हणण्यास कोणतीं कारणें आहेत हें मी आपल्यापुढें मांडतों:—

## कारण पहिलें–जन्मसिद्ध हक्क

इंग्लंडनें हिंदुस्थानांत अगदीं पहिला प्रांत मिळविला त्या वेळींच आमचा हा जन्मसिद्ध हक्क जाहीर करण्यांत आला आहे. ब्रिटिश स्वभावाच्या व राज्यपद्धतीच्या मुख्य तत्त्वाप्रमाणें त्या वेळच्या ब्रिटिश मुत्सद्द्यांनीं कोणत्याहि देशांतील नागरिक कोणत्याहि कारणानें ब्रिटिश निशाणाखालीं नांदूं लागल्याबरोबर इंग्लंडांत जन्मलेल्या व राहिलेल्या स्वतंत्र ब्रिटिश नागरिकाप्रमाणें त्याला समजण्यांत यावें असें ठरवून टाकलें आहे.

ब्रिटिश स्वभावाचें व राज्यपद्धतीचें मुख्य तत्त्व कोणतें

हें सध्यांच्या मुख्य प्रधानांच्या भाषेंतच मी सांगतों:—

स्वातंत्र्य हें आमच्या जीविताचें रहस्य आहे. स्वातंत्र्य-रक्षणाकरितांच आम्ही तयार असतों. स्वातंत्र्यरक्षणाचें धोरण हेंच आमच्या राज्यकारभाराचें धोरण आहे.

मि. मोर्ले यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे:—

आपल्या उच्चाराबरोबर इंग्लिश लोकांची आठवण करून देणारा 'स्वातंत्र्य' हा पवित्र शब्द, यानेंच आज-पर्यंत मानवजातींचीं हृदयें उच्च महत्त्वाकांक्षांनीं उचंबळून सोडलीं आहेत.

स्वतंत्र राहण्याचा किंवा स्वतंत्र असण्याचा हा जन्म-सिद्ध हक्क आम्ही ब्रिटिश निशाणाखालीं आलों व इंग्लं-डचा आमच्याशीं संबंध जडला त्याबरोबरच आम्हांला मिळाला आहे.

हिंदुस्थानांतील अगदीं पहिला प्रदेश म्हणून ईस्ट इंडिया कंपनीला जेव्हां मुंबई बेट मिळालें, तेव्हां या प्रदे-शच्या राज्यकारभाराच्या हक्कांची पहिली देणगी म्हणून कंपनाला देण्यांत आली त्या वेळीं ब्रिटिश सरकारनें असें जाहीर केलें कीं,

"या बेटांतील राहणारे लोक हे ग्रेट ब्रिटनच्या राजाचे

प्रजाजन असल्यामुळें त्यांचीं मुलेंबाळें आणि त्यांचे वंशज यांना इंग्लंडमध्यें जन्मलेल्या व राहिलेल्या प्रजाजनांप्रमाणें स्वतंत्र ब्रिटिश प्रजाजन समजण्यांत यावें."

( Extract from the "Grant to the Esst India company of the island of Bombay, dated 24 th march 1669" )

आणि यापुढें ब्रिटिशांना मिळालेल्या सर्व प्रांतांना पहिल्या देणगींतील हीं सर्व कलमें लागू करण्यांत आलीं. याप्रमाणें स्वतंत्र असण्याचा हिंदी लोकांना हक्क असून इंग्लंडांत जन्मलेल्या व राहिलेल्या ब्रिटिशांप्रमाणेंच आम्हांलाहि हक्क आहेत असें हिंदुस्थानाशीं इंग्लंडचा अगदीं प्रथम संबंध जडला त्या वेळीं जाहीर रीतीनें मान्य करण्यांत आलेलें आहे.

ब्रिटिश निशाणाखालीं आल्यानंतर स्वतंत्र ब्रिटिश प्रजाजनांचे हक्क आम्हांला देण्यांत यावे असें १७ व्या शतकांत म्हणजे दोन अडीच शतकांपूर्वी जाहीर करण्यांत आलें, हें मीं आपणास दाखविलेंच आहे. विसाव्या शतकांतील प्रसिद्ध मुत्सद्द्यांपैकीं दोघे मुत्सद्दी यासंबंधानें काय म्हणतात हें मी आतां आपल्यास सांगणार आहें. बोअर

लोकांचा पराभव झाला, ते ब्रिटिशांच्या स्वाधीन झाले, व ब्रिटिश निशाणाखालीं आले, त्या वेळीं हल्लींचे मुख्य प्रधान म्हणाले कीं, ( ता. १४ जून १९०१ )–

" ज्या लोकांशीं आमचा संबंध झाला ते लोक आमचे नागरिक बंधु व्हावयाचे आहेत असें नसून सध्यांच त्यांना आमच्या देशांतील नागरिकत्वाचे हक्क मिळालेले आहेत."

याप्रमाणें ब्रिटिश राज्यछत्राखालीं आलेले लोक त्याच क्षणीं स्वतंत्र ब्रिटिश नागरिक बनतात. ब्रिटिश निशाणाखालीं आलेल्या पहिल्या क्षणापासून इंग्लंडांत जन्मलेल्या व राहिलेल्या लोकांप्रमाणें आम्ही हिंदी लोकहि स्वतंत्र ब्रिटिश नागरिक झालेले आहोंत.

बोअर युद्धांत ब्रिटनला २० कोटी रुपये खर्च करावे लागले; या युद्धांत ब्रिटिशांचे २० हजार शिपाई कामास आले व २० हजार जखमी झाले. उलटपक्षीं हिंदुस्थानानें ब्रिटनला खर्चांत आणण्याऐवजीं वैभवास चढविलें असून याकरितां बहुतेक सर्व हिंदी शिपायांनींच आपलें रक्त रणभूमीवर सांडलें आहे. असें असून सुद्धां हिंदी लोकांत व बोअर लोकांत हा चमत्कारिक भेद करण्यांत आला आहे. जिंकल्यानंतर थोडयाच वर्षांत बोअर लोकांना

स्वराज्याचे हक्क मिळाले; पण हिंदुस्थानचा ब्रिटिशांशीं राजकीय संबंध जडून २०० वर्षे झालीं तरी हिंदुस्थानाला स्वराज्याचे हक्क देण्यांत आलेले नाहींत.

सतराव्या शतकांतील ब्रिटिश मुत्सद्द्यांच्या उदार बुद्धीबद्दल व धोरणाबद्दल आम्हांला मोठा आदर वाटत असून आम्ही त्याची महती गात असतों. राज्यसूत्रें हातीं असलेल्या तेव्हांच्या उदारमतवादी मुत्सद्द्यांना ब्रिटिश स्वातंत्र्याचा अभिमान वाटत असून त्या पवित्र प्राचीन उदार तत्त्वांचे आज पुनरुज्जीवन झालेलें दिसत आहे. तेव्हां इंग्लंडांत जन्मलेल्या व राहिलेल्या प्रजाजनांप्रमाणें हिंदी लोकांनाहि त्यांचा हा जन्मसिद्ध हक्क देऊन हीं प्राचान तत्त्वें सध्यांचें ब्रिटिश सरकार अमलांत आणील, अशी आशा केल्यास त्यांत कांहीं वावगें होईल असें नाहीं. ही गोष्ट घडवून आणणें हें इंग्लंडचें अवश्य कर्तव्य होऊन बसलें आहे. प्रत्येक ब्रिटिश हिंदी नागरिकास इंग्लंडांत अर्थातच हा स्वतंत्र नागरिकत्वाचा हक्क असून त्याला पार्लमेंटचा सभासदहि होतां येते. या गोष्टीला हरकत करण्याचें इंग्लंडांत कोणाच्या स्वप्नीं देखील येत नाहीं. एकदां माझ्या बाबतींत पक्षभेदाच्या दृष्टीनें माझें नांव इलेक्टरच्या

यादींत नोंदविण्याच्या कामीं हरकत घेण्यांत आली होती; पण मी हिंदी म्हणूनच ब्रिटिश नागरिक आहें या तत्त्वावरच माझ्यासंबंधांतली ही हरकत काढून टाकण्यांत आली.

## कारण दुसरें-वचनदत्त हक्क

पहिल्या कारणांत ईस्ट इंडिया कंपनीला राज्यकारभाराच्या हक्कांची जी देणगी देण्यांत आली म्हणून सांगितलें ती देणगी म्हणजे ब्रिटिश नागरिकांप्रमाणें हिंदी नागरिकांना दिलेल्या हक्कांचा केवळ जाहीरनामाच नसून या जाहीरनाम्याबरोबरच ते हक्क प्रत्यक्ष देण्याचें जाहीर आश्वासनच देण्यांत आलें आहे.

१८५८ सालचा जाहीरनामा लिहिण्याविषयीं लॉर्ड डर्बी साहेबांना पत्र लिहून व्हिक्टोरिया महाराणीसाहेबांनीं त्यांस कळविलें कीं,

"सुधारणेच्या शिखरावर आरोहण करणाऱ्या वैभवशाली ब्रिटिश राज्याच्या प्रजाजनांशीं समतेच्या नात्यानें वागतांना हिंदी लोकांना कोणकोणते हक्क देण्यांत येतील हें जाहीरनाम्यांत स्पष्ट रीतीनें लिहा."

याप्रमाणें ईश्वर साक्ष ठेवून मोठ्या गंभीरपणानें व स्पष्टपणानें या जाहीरनाम्याच्या द्वारें असें जाहीर करण्यांत

व असें आश्वासन देण्यांत आलें कीं,

"आमच्या इतर प्रजाजनांप्रमाणें हिंदी प्रजेविषयींच्या कर्तव्यानें आम्ही बद्ध झालों असून सर्वशक्तिमान् परमेश्वराच्या आशीर्वादानें हें कर्तव्य प्रामाणिकपणानें व सद्-सद्विवेकबुद्धिपूर्वक आम्ही पार पाडूं."

ईश्वर आणि मनुष्य साक्ष ठेवून दिलेलें यापेक्षां अधिक पवित्र व गंभीर आश्वासन दुसरें कोणतें असेल काय?

इंग्लंडच्या राणी व हिंदुस्थानच्या महाराणी साहेब यांनीं जाहीरनाम्याच्या वेळीं आपल्यास पाठविलेली तार लॉर्ड लिट्नसाहेबांनीं हिंदी राजेरजवाड्यांच्या व प्रजाजनांच्या दरबारांत वाचून दाखविली. तींत असें म्हटलें होतें कीं,

"आमच्या राज्यछत्राखालीं राजापासून रंकापर्यंत सर्वांना स्वातंत्र्य, समता व न्याय यांच्या उदात्त तत्त्वांबरहुकूम हक्क मिळतील व हिंदी लोकांना सुख प्राप्त व्हावें, त्यांच्या संपत्तींत भर पडावी, व त्यांचें हित वृद्धिंगत व्हावें अशाच प्रकारचें आमच्या साम्राज्याचें उद्दिष्ट व ध्येय आहे."

आणि यावरून न्याय, समता व स्वातंत्र्य या उदात्त तत्त्वान्तर्गत हकाचा उपभोग आम्हांला घेतां आला, तरच

आमच्या सुखवृद्धीचा उद्देश सिद्धीस जाईल. आणि हें साध्य होण्यास ब्रिटिश लोकांप्रमाणें आमचें राज्य आम्हीं चालविण्याचें स्वातंत्र्य आम्हांला मिळालें पाहिजे.

१८८७ सालच्या जुबिलीच्या प्रसंगीं महाराणीसाहेबांनीं आश्वासन देऊन या जाहीरनाम्यास पुनः बळकटी आणली आहे.

"हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें प्रत्यक्ष हातांत घेण्यांत आलीं त्या वेळीं प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्यास हिंदी राजेरजवाड्यांस दिलेली स्वातंत्र्याची सनद असें म्हणण्यांत आलें असून या जाहीरनाम्यांतील तत्त्वें कडक रीतीनें अमलांत आणण्यांत यावीं अशी माझी उत्कट इच्छा आहे व ती तशीच पुढें राहील."

या स्वातंत्र्याच्या सनदेशिवाय म्हणजे ब्रिटिश नागरिकाच्या हक्काशिवाय आम्हीं या वेळीं दुसरें कांहीं मागत नाहीं.

माजी एडवर्ड बादशहांनींहि ता. १९ फेब्रुवारी १९०६ रोजीं केलेल्या आपल्या भाषणांत आम्हांला असेंच आश्वासन दिलें होतें.

"साम्राज्यनिष्ठा व साम्राज्यवैभव यांच्या बाढीबरो-

 स.नि. ३०९



बरच साम्राज्यांतील वसाहती व इतर देश यांतील लोकांना स्वतंत्र लोकसत्ताक संस्था स्थापण्याचे हक्क देण्यांत येतील अशी मला उत्कट आशा वाटत आहे.''

आणि मुख्य प्रधान सुद्धां या सर्वांचें तात्पर्य सांगतांना स्वराज्याची तहान सुराज्यानें भागणार नाहीं असें म्हणाले.

सुराज्य हें स्वराज्याची बरोबरी कधींहि करूं शकणार नाहीं. व देशाच्या सांपत्तिक स्थितीकडे दुर्लक्ष करून अरेरावीच्या बेसनदशीर तत्त्वावर चालविलेलें राज्य तर स्वराज्याची बरोबरी करणारच नाहीं. आणि म्हणूनच देशाची सांपत्तिक स्थिति सुधारून देशांत साम्राज्यनिष्ठेची वाढ होण्याकरितां देशांतील लोकांना स्वतंत्र लोकसत्ताक संस्थांचे हक्क देणें अवश्यक आहे. ब्रिटिश लोकांची कर्तव्य-बुद्धि, त्यांच्या मनाचा थोरपणा, दिलेलीं आश्वासनें सदसद्विवेकबुद्धिपूर्वक पूर्ण करण्याची त्यांची तत्परता, स्वातंत्र्याबद्दलचें त्यांचें प्रेम व त्यांची उच्च परंपरा या सर्वांचा विचार करतां आम्हांला दिलेलीं आश्वासनें सहजच पूर्ण करण्यांत येतील.

## कारण तिसरें-पुनरुज्जीवन

हिंदुस्थाननें आजपर्यंत सोसलेलीं दुःखें व आज कित्येक

शतकें त्यावर आलेलीं संकटें यांचा विचार करतां ईश्वरी कृपेनें व मानवी प्रयत्नानें या दुःखांचें व संकटांचें परिमार्जन होण्याची वेळ आली असून स्वातंत्र्याच्या व स्वराज्याच्या प्राचीन ब्रिटिश बौद्धिक संस्कारांचें ज्या देशांत पुनरुज्जीवन झालें आहे, त्या ब्रिटिश लोकांकडूनच हिंदुस्थानचा पुनरुद्धार व्हावा अशी आमची आशा आहे.

## कारण चवथें-सदसद्विवेकबुद्धि

आज दीडशें वर्षें ज्या अस्वाभाविक पद्धतीनें हिंदुस्थानचें राज्य चालविण्यांत येत आहे, तसली राज्यपद्धति ब्रिटिश लोकांनीं एक दिवसभर देखील टिकूं दिली नसती.

पार्लमेंट किंवा याच्यापेक्षांहि अधिक पवित्र वस्तु म्हणजे मनुष्याच्या मनांत सहानुभूतीची प्रेरणा करणारें सदसद्विवेकजन्य बुद्धितत्त्व होय, असें हाऊस ऑफ कॉमन्समध्यें बोलतांना सर हेनरी बॅनरमन एकदां म्हणाले होते.

हीच सदसद्विवेकबुद्धि अधिक व्यापक करून हिंदुस्थानाविषयीं विचार करा, असें इंग्लिश राज्यकर्त्यांना माझें सांगणें असून हीच गोष्ट लॉर्ड मोर्ले यांच्या शब्दांत सांगावयाची म्हणजे ती अशी सांगतां येईल:—

"ज्या देशाचें विशालत्व तुमच्या दृष्टीला आकलन सुद्धां करतां यावयाचें नाहीं, अशा त्या भव्य विशाल हिंदुस्थानदेशाच्या हिताहितासंबंधानें एक बुद्धि व आपली मातृभूमि इंग्लंड त्याच्यासंबंधानें एक बुद्धि, असा द्वैत भाव ज्या दिवशीं उत्पन्न होईल तो दिवस म्हणजे खरोखर आपल्या दुर्दैवाचाच दिवस होय असें समजलें पाहिजे."

ब्रिटिश नागरिकांना कोणते हक्क आहेत व कोणत्या हक्कांची मागणी आम्ही करतों हा यापुढला प्रश्न होय.

या प्रश्नासंबंधानें सविस्तरपणानें विचार करण्याची ही वेळ नसून ठोकळ मानानें मी याचा विचार करणार आहें.

( १ ) सर्व ग्रेटब्रिटनचा राज्यकारभार आणि तेथील राज्यकारभाराच्या व जमाखर्चाच्या सर्व बाबी यांचा विचार करण्याचें ज्याप्रमाणें ब्रिटिश लोकांच्या हातीं आहे, त्याप्रमाणेंच हिंदुस्थानचा राज्यकारभार हिंदी लोकांच्याच हातीं असावा अशी आमची हक्काची मागणी आहे.

केवळ हक्काचा किंवा सुशिक्षित लोकांच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याचाच हा प्रश्न नसून, सर जॉन शोअर यांनीं दर्शविल्याप्रमाणें हिंदुस्थानांतील संपत्तीस परदेशांकडे १२० वर्षांपूर्वी ओहटी लागल्यामुळें हिंदुस्थान कंगाल

होऊन त्याच्यावर जें अरिष्ट कोसळलें आहे, त्यांतून पार पडण्याचा हाच एक उपाय असल्यामुळें हे हक्क मिळणें अत्यंत जरूरीचें आहे. आधिभौतिक, नैतिक, बौद्धिक, सामाजिक, राजकीय, औद्योगिक याप्रमाणें आणखी इतर प्रत्येक बाबतींत हिंदी लोकांची प्रगति व त्यांचें कल्याण होण्याकारितां याच उपायाची अवश्य योजना झाली पाहिजे.

( २ ) कायदे करणें, कर बसविणें व पैसा खर्च करणें या सर्व गोष्टी ज्याप्रमाणें ग्रेटब्रिटन व वसाहती येथील लोकप्रतिनिधींच्या ताब्यांत आहेत त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील लोकप्रतिनिधींचाहि यांवर ताबा असावा.

( ३ ) इंग्लंड व हिंदुस्थान यांच्यामधील जमाखर्चाच्या बाबींचा समतेच्या व न्यायाच्या तत्त्वावर विचार झाला पाहिजे. आणि हिंदुस्थान हें साम्राज्याचें भागीदार असल्यामुळें मुलकी, लष्करी व आरमार खात्याकडे खर्च करण्याकरितां हिंदुस्थान जे पैसे बाजूस काढील, त्यांतून पगार, पेन्शनें, भत्ता वगैरेच्या रूपानें हिंदी लोकांनाच योग्य हिस्सा मिळाला पाहिजे. या बाबतींत आमच्यावर कोणाचे उपकार नको आहेत. आम्हांला फक्त न्याय पाहिजे. ब्रिटिश नागरिकाच्या हक्कासंबंधानें फारसें विव-

रण करण्याच्या भरीस न पडतां या सर्वांचें सार एका शब्दांत सांगावयाचें म्हणजे ग्रेटब्रिटन व वसाहती या देशांप्रमाणें

**आम्हांस स्वराज्य पाहिजे**

आहे, असें सांगतां येईल.

"इंग्लिशांचा राष्ट्रीय थोरपणा, सामर्थ्य व आशा यांच्या मुळाशीं त्यांचीं राजकीय तत्त्वें आहेत" असें मोर्ले म्हणतात, तें कांहीं खोटें नाहीं.

तसेंच हिंदुस्थानच्या बाबतींतहि स्वराज्याच्या हक्काच्या तत्त्वावर हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची उभारणी झाल्याशिवाय हिंदी लोकांच्या आकांक्षा पूर्ण व्हावयाच्या नाहींत, त्यांचें सामर्थ्य वाढावयाचें नाहीं व त्यांच्या राष्ट्रीय उदात्त भावनांचें कोठेंहि तेज पडावयाचें नाहीं.

आतां यापुढला दुसरा प्रश्न म्हणजे हे स्वराज्याचे हक्क आतांच किंवा कांहीं दिवसांनीं व कशा प्रकारानें देतां येणें व्यवहार्य आहे याचा विचार करणें होय. सध्यांची राज्यपद्धति एकदम बदलून टाकून मी आतां केलेल्या व्याख्येप्रमाणें स्वराज्याची राज्यपद्धति सुरू करावी असें कोणीहि म्हणणार नाहीं.

## हक्क पहिला
## सरकारी नोकरींत हिंदी लोकांचा प्रवेश

प्रत्येक सरकारी खात्याचा राज्यकारभार हिंदी लोकांच्या हातांत असला पाहिजे, हा आमचा पहिला हक्क आहे. अगदीं आरंभीं म्हणून राज्यकारभारांतील कोणतीहि गोष्ट राजनिष्ठापूर्वक, विश्वासानें व पद्धतशीर रीतीनें करून दाखविण्याची व याच कर्तृत्वशक्तीचा स्वराज्याच्या हक्कप्राप्तींत आपोआप पूर्ण विकास होण्याची वेळ सध्यां आली नाहीं काय?

मी म्हणतों, होय; अशा प्रकारचा आरंभ करण्याची वेळ आतांच आली आहे असें नसून बरेच दिवसांपूर्वी ही गोष्ट अमलांत आणावयास पाहिजे होती. जवळ जवळ पाउणशें वर्षांपूर्वीं इंग्लिश मुत्सद्द्यांनीं हिंदी राज्यकारभारासंबंधानें अशा प्रकारचा उपक्रम करण्याचा नुसता विचार केला व त्याप्रमाणें त्यांनीं केवळ जाहीर आश्वासन दिलें एवढेंच नसून, अशा प्रकारचा उपक्रम करण्यासंबंधानें त्यांनीं पार्लमेंटांत एक कायदाहि पास करून घेतला होता. पार्लमेंटमध्यें पास झालेला तो कायदा सचोटीचा व्यवहार या दृष्टीनें व प्रामाणिकपणानें अंमलांत आणला असता

व त्याप्रमाणें हिंदुस्थानचा कारभार आज इतके दिवस चालला असता तर हिंदुस्थान व इंग्लंड यांच्या परिस्थितींत महदंतर पडून हिंदी लोकांतील असंतोष, कंगालपणा व दारिद्र्य यांसंबंधानें सध्यां रड गाण्याची पाळी न येतां हिंदुस्थानच्या ऐश्वर्याचे व त्याबरोबर इंग्लंडच्याहि वाढत्या वैभवाचे पोवाडे गाण्याची वेळ सध्यां आली असती.

गेल्या शतकाच्या तिसऱ्या दशकांत इंग्लंडनें आपल्या साम्राज्यांतील गुलामगिरीला हद्दपार करून मनुष्याचा देह व आत्मा यांची पारतंत्र्यांतून मुक्तता केल्यामुळें व आपल्या प्रजेला बुद्धिस्वातंत्र्य उपभोगण्याचा ब्रिटिश नागरिकाचा हक्क दिल्यामुळें इंग्लिश राष्ट्र अगदीं सुधारणेच्या शिखरास पोंचलें. इंग्लंडच्या त्या वैभवाच्या दिवसांत त्या वेळच्या इंग्लिश मुत्सद्दयांना हिंदी लोकांसंबंधाच्या आपल्या कर्तव्याचा विसर पडला नव्हता. ब्रिटिश लोकांशीं संबंध ठेवून अथवा प्रसंगीं ब्रिटिश राष्ट्राचा संबंध तोडून सुद्धां हिंदी लोकांना स्वराज्य चालवितां येईल कीं नाहीं, या प्रश्नाची त्यांनीं मुद्दाम व उघडपणें चर्चा केली होती. १८३३ सालीं कंपनीचा कायदा पास झाला त्या वेळीं ब्रिटिश लोकांच्या हिंदुस्थानाविषयींच्या कर्तव्यासंबंधानें

मेकॉलेसाहेबांनीं जें चिरस्मरणीय भाषण केलें त्याबद्दल ब्रिटिश लोकांना केव्हांहि अभिमान वाटेल. त्यांचें सर्व भाषण येथें देतां येणें शक्य नाहीं. त्या मुत्सद्द्यांच्या त्या वेळच्या भाषणांतील प्रत्येक शब्द विचारार्ह असल्यामुळें त्यांतील फक्त थोडे उतारे मी खालीं देत आहें. ते प्रथम म्हणाले कीं,

"इ. स. १८६३ च्या कायद्यांतील समान हक्काचें कलम असलेलें बिल तयार करण्याच्या कामांत मीं मदत केली या गोष्टीचा मला जन्मभर अभिमान वाटेल. हिंदुस्थानच्या लोकांच्या परिस्थितीसंबंधानें अगदीं स्वार्थी दृष्टीनें विचार करावयाचा म्हणजे हिंदी लोकांनीं सदोष राज्यपद्धतींत आमच्या अंमलाखालीं राहण्यापेक्षां ते आमचा संबंध तोडून स्वतंत्र होतील व त्यांना सुराज्य प्राप्त होईल, तर त्याबद्दल आम्हांला फार बरें वाटेल. परमेश्वरानें ज्या लोकांना आमच्या स्वाधीन केलें, त्यांनीं असहाय होऊन आमच्याच ताब्यांत राहावें म्हणून त्या थोर मनोवृत्तीच्या लोकांना मोहित करून हतबल करणारा धोंटा तयार करण्याच्या कामास आम्ही केव्हांहि संमति देणार नाहीं. मानवी वंशांतील एका भागास स्वातंत्र्याचा

व सुधारणांचा समान भाग तोडून देण्यास आम्ही जर कांकूं करूं लागलों तर आम्ही स्वतंत्र किंवा सुधारलेले कसले? आमचा कर्तव्यपथ आम्हांपुढें स्पष्ट असून याच मार्गानें गेल्यास आपल्या बुद्धीचा थोरपणा दिसून येईल, आपलें राष्ट्रीय वैभव वाढेल व आपलें राष्ट्र बहुमानास पात्र होईल, असें म्हणण्यास मला मुळींच भीति वाटत नाहीं. पारतंत्र्याच्या व अंधश्रद्धेच्या गर्तेत लोळत पडलेल्या लोकांस हाताशीं धरून त्यांच्यांत नागरिकत्वाचे हक्क प्राप्त करून घेण्याच्या आकांक्षा उत्पन्न होतील व ते हक्क संभाळण्याची त्यांच्यांत योग्यता उत्पन्न होईल अशा पद्धतीनें त्यांच्यावर राज्य केल्यास खरोखरच आमच्या राष्ट्राच्या ऐश्वर्याची एका कलेनें वाढच होईल."

असल्या उच्च व उदात्त भावनेनें पूर्ण असलेल्या वातावरणांत तयार झालेलें, किंवा मेकॉलेसाहेबांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे 'शहाणपणाचें, उदार धोरणानें रचलेलें व उच्च भावनेनें युक्त असलेलें' बिलांतील कलम पुढीलप्रमाणें होतें.

" त्या देशांतील रहिवाशी किंवा जन्मसिद्ध हक्कानें झालेला बादशहाचा प्रजाजन केवळ धर्म, जन्म, वंश,

वर्ण किंवा इतर कोणत्याहि कारणानें कंपनीच्या राज्यांतील नोकरी करण्यास नालायक ठरविला जाऊं नये."

या कलमासंबंधानें मी वारंवार जें बोललों आहें, त्याचा पुनरुच्चार येथें करीत नाहीं. या कलमाची योग्य अंमलबजावणी करण्यासाठीं इंग्लंडप्रमाणें हिंदुस्थानांतहि एकाच वेळीं सिविलसर्विसची परीक्षा घेण्यांत यावी असें सरकारी रीतीनें जाहीर करण्यांत आलें, एवढें सांगितलें म्हणजे बस्स होईल.

म्हणूनच, एखादी नवीन गोष्ट नव्हे, तर ७३ वर्षांपूर्वीं पूर्ण विचारान्तीं झालेल्या पार्लमेंटच्या कायद्यानें निश्चित झालेल्या गोष्टीचा एकदम उपक्रम करण्यास कांहीं हरकत नाहीं. या कलमाची अंमलबजावणी करण्याचा अधिकारहि हिंदुस्थानच्या स्टेटसेक्रेटरींच्या हातांत सर्वस्वीं देऊन टाकला असून त्याची कोणत्याहि क्षणास अंमलबजावणी करावयाची असल्यास पार्लमेंटच्या मंजुरीची किंवा त्याच्या हुकुमाची आतां आवश्यकता राहिलेली नाहीं.

आणि याबरोबरच स्टेटसेक्रेटरींना आमची अशी आग्रहपूर्वक सूचना आहे कीं, चढाओढीच्या तत्त्वास बाजूस सारून हिंदी लोकांना प. सर्विसमध्यें घेण्याची जी

अनिष्ट पद्धत सध्यां पडली आहे, ती त्यांनीं नाहींशी करावी. प. सर्विसमध्यें प्रथम रुजू करतांना इंग्लंडमध्यें चढाओढीच्या तत्त्वावरच मुख्यतः भर असल्यामुळें हिंदुस्थानांतहि तीच पद्धत सुरू करणें हें अत्यंत सरळपणाचें व न्यायाचें आहे.

सध्यांच्या पद्धतीमुळें सांपत्तिक दृष्टीनें देशाचें जें नुकसान होत आहे तें भरून काढण्यास अशा प्रकारचा उपक्रम हाच एक उत्तमोत्तम परिणामकारक उपाय आहे.

"राष्ट्राच्या सांपत्तिक बाबींत जर तुम्ही अन्यायानें ढवळाढवळ कराल तर तुम्ही आपल्या राष्ट्राचें जीवित, अंतःकरण व मर्म यांच्या अस्तित्वावरच घाला घालीत आहां हें पक्कें समजा." असें मोर्ले जें एकदां म्हणाले होते तें सर्वस्वीं खरें आहे.

आणि त्याप्रमाणें सध्यांच्या पद्धतींतील राष्ट्राच्या सांपत्तिक बाबींत ढवळाढवळ करण्याच्या दोषामुळें आमच्या राष्ट्राच्या अस्तित्वावरच घाला पडण्याची वेळ आली आहे. आमच्या राष्ट्रांतील संपत्ति लुटून नेणाऱ्या व आमच्यांतील कर्तृत्वशक्ति व शहाणपण नाहींसें करणाऱ्या, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे राष्ट्र जीवंत राह-

ण्यास अवश्य असलेल्या प्रत्येक गोष्टीला आम्हांस पारखें करून सोडणाऱ्या या पद्धतीनें आमचें अत्यंत नुकसान झालें आहे.

प. सर्विसच्या बाबतींत वर सांगितल्याप्रमाणें उपक्रम करण्यांत आल्यास या सांपत्तिक ढवळाढवळीच्या मुळावरच घाव घातल्याप्रमाणें होईल. वरील सर्व अरिष्टांतून हिंदुस्थानास मुक्त करण्याची गुरुकिल्ली म्हणजे या सर्विसमध्यें युरोपियनांच्या ऐवजीं हिंदी लोकांना घेण्याची सुधारणा करणें ही होय.

कामाच्या चोखपणाच्या दृष्टीनें पाहिलें तरी या सर्विसमध्यें परकी लोकांना ठेवल्यानें आमचीं कामें चोख व्हावयाचीं नाहींत, इतकेंच नव्हे, तर या लोकांना कामाला ठेवून आमचें भागावयाचेंहि नाहीं.

"चोख रीतीनें व फारसा खर्च न पडतां हिंदी लोकांचा राज्यशकट आम्हांला चालवावयाचा असल्यास त्यांची मदत घेऊनच आम्हीं त्यांच्यावर राज्य केलें पाहिजे." असें सर विल्यम हंटर एकदां म्हणाले होते.

इंडियन सेक्रेटरी या नात्यानें डयूक ऑफ डेव्हनशायर एकदां म्हणाले कीं, "हिंदुस्थानचा राज्यकारभार चाल-

विण्याच्या कामांत नोकर लोकांचा योग्य पुरवठा होत नाहीं, असें माझें निःसंशय मत झालें आहे."

उघड उघड विचार केला तरी कोणाचेंहि याव्यतिरिक्त दुसरें मत व्हावयाचें नाहीं.

इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही देशांत प. सर्विसची परीक्षा कांहीं वर्षे चालू ठेवण्यांत आल्यानंतर कोणत्याहि प्रकारचा त्रास न पडतां स्वराज्याचें गाडें सुरळीत आणि शांतपणानें चालण्याकरितां व स्वराज्याच्या हक्कांपैकीं पहिल्या हक्काची मागणी पूर्ण करण्याकरितां या परीक्षा फक्त हिंदुस्थानांतच सुरू ठेवण्याची वेळ येईल.

स्वराज्याच्या हक्कांपैकीं पहिल्या हक्काच्या परिपूर्तेतेच्या या महत्त्वाच्या उपक्रमाबरोबरच हा उद्देश लवकर फलप्रद होण्याकरितां मोफत व सक्तीचें प्राथमिक शिक्षण व सर्व प्रकारचें मोफत दुय्यम शिक्षण यांचा फैलाव करण्याचा जोराचा प्रयत्न झाला पाहिजे. शिक्षणाप्रीत्यर्थ कितीहि पैसा खर्च केला तरी लोक मोठ्या संतुष्ट चित्तानें सरकारच्या या प्रयत्नाचें अभिनंदनच करतील. माझ्या बरोबरीचे विद्यार्थी व माझ्याबरोबर काम करणारी इतर सुशिक्षित मंडळी लोककल्याणार्थ देशसेवेंत आपलें सर्वस्व खर्ची

घालण्यास तयार होण्यास लोकांनीं आपल्या खर्चानीं चालविलेल्या मोफत शिक्षणाच्या शाळांतून मिळालेलें शिक्षणच कारणीभूत झालेलें आहे.

एका बाजूनें शिक्षणाचा फैलाव व दुसऱ्या बाजूनें राज्यकारभाराचें प्रत्यक्ष ज्ञान या दोहोंच्या साहाय्यानें स्वराज्याची सिद्धि दुसऱ्या कांहीं लोकांच्या कल्पनेपेक्षां अधिक लवकर होईल.

खर्चाचा बोजा ही सबब कांहीं उपयोगी नाहीं. खरोखर इंग्लंड आणि हिंदुस्थान यांच्यांतील नात्याच्या दृष्टीनें जमाखर्चाच्या संबंधांत न्याय्य विभागणी करण्यांत आल्यास हिंदुस्थानच्या कराच्या लहानशा उत्पन्नांतूनहि बरीचशी सवड काढतां येईल आणि त्याच वेळीं सरकारी कामांतील युरोपियनांच्या ऐवजीं हिंदी लोकांचीच भरती करीत गेल्यास शिक्षण वगैरेसारख्या जरूरीच्या सुधारणा करण्याकरितां पैसे खर्च करण्याचें हिंदुस्थानचें सामर्थ्यहि वाढत जाईल.

## हक्क दुसरा-प्रातिनिधिक सत्ता

पुष्कळशा श्रीमंत व मध्यम वर्गाच्या लोकांना व सर्वसामान्य जनतेला मताचा अधिकार मिळण्यापूर्वींच आज

बरींच शतकें इंग्लंडांत पार्लमेंटची राज्यसंस्था अस्तित्वांत आली आहे.

सन १८३१ सालपर्यंत रीजंट पार्कच्या सभोंवार असलेल्या मोठमोठ्या भव्य राजवाड्यांत व अशाच इतर ठिकाणीं राहणाऱ्या श्रीमंत लोकांचें मत पार्लमेंटचे सभासद निवडतांना घेतलें जात नसे, असें मेकॉलेसाहेबांनीं म्हटलें आहे. सन १८३२ सालीं मध्यम वर्गाच्या लोकांना मताचा अधिकार मिळाला. व नुक्ते नुक्ते म्हणजे १८८५ सालीं सामान्य जनतेपैकीं पुष्कळ लोकांना हा अधिकार मिळाला. स्त्रियांना हा हक्क नाहीं, आणि वयांत आलेल्या प्रत्येक मनुष्याला हा हक्क देण्यासंबंधाचा प्रश्न अद्याप वादांतच आहे.

म्हणूनच ग्लॅडस्टनसाहेबांनीं म्हटल्याप्रमाणें सार्वत्रिक प्रतिनिधित्वाचा ( Living representation) हक्क देण्याचा चांगलासा प्रारंभ सध्यां हिंदुस्थानांत करतां यावयाचा नाहीं असें म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आम्हांला एकाच गोष्टीची जरूरी आहे व ती गोष्ट म्हणजे सरकारची इच्छा ही होय. सध्यां राज्यकारभारावर असलेलें मुत्सद्दी अशाप्रकारचा योग्य उपक्रम करण्यास समर्थ असून हा उपक्रम

पद्धतशीर रीतीनें करण्यांत आल्यास थोडक्याच दिवसांत स्वसत्ताक राज्यपद्धतीनें चाललेल्या वसाहतीप्रमाणें स्वराज्य चालविण्यास लागणारे कायदे करण्याइतकी हिंदी लोकांची खास प्रगति होईल. प्रातिनिधिक सत्तेच्या शक्याशक्यतेचा व व्यापकपणाचा सविस्तर रीतीनें विचार करण्याची या प्रसंगीं जरूरी आहे असें मला वाटत नाहीं. इंग्रजी शाळांतून व कॉलेजांतून शिकलेल्या सुशिक्षित व विचारी लोकांनाच या गोष्टी समजतात असें नसून देशी वर्तमानपत्रांच्या व देशी वाङ्मयाच्या द्वारानें हिंदी लोकांपैकीं पुष्कळ मोठ्या वर्गास ब्रिटिश लोकसत्ताक संस्थांचे व जगांतील निरनिराळ्या देशांच्या राज्यकारभारांतील उलाढालींचे व्यवहार आतां कळूं लागले आहेत.

अरेरावीच्या सत्तेसंबंधानें सर्व जगभर प्रसिद्ध असलेल्या आपल्या बादशहांकडून रशियन शेतकऱ्यांनीं ड्यूमा सभेचे हक्क मिळविले व स्वतंत्र ब्रिटिश साम्राज्याच्या मुख्य प्रधानांनीं, ड्यूमा सभा चिरंजीवी होवो, असा आशीर्वादहि दिला. त्या मुख्य प्रधानांच्या साम्राज्यबंधूचा जन्मसिद्ध व वचनदत्त हक्क मिळालेले आम्ही स्वतंत्र ब्रिटिश नागरिक रशियन शेतकऱ्यांपेक्षां घटनाबद्ध राज्यपद्धती-

च्या स्वराज्याचे हक्कास अधिक पात्र आहोंत. स्वराज्याच्या प्राप्तीबद्दल मला निराशा वाटत नाहीं. देशांतील सर्व लोक पात्र होईपर्यंत थांबण्यास सांगणें व्यर्थ आहे. पार्लमेंटचें हक्क प्राप्त करून घेण्यास ब्रिटिश लोक अशा प्रकारानें खोळंबून राहिले नाहींत. आज दीडशें वर्षें आमच्या अंगीं योग्यता येण्याबद्दल आम्हांला संधि देण्यांत आली नाहीं. आपला राज्यकारभार करण्याची जबाबदारी आम्हीं प्रत्यक्ष अंगावर घेतल्याशिवाय आमच्या अंगीं कधींहि योग्यता यावयाची नाहीं. पूर्वेकडील चिनी व पश्चिमेकडील इराणी लोक खडबडून जागे झाले आहेत. जपानी राष्ट्रानें या सर्वांच्या अगोदरच उन्नतिशिखर गांठलें आहे, रशियन लोक स्वातंत्र्याकरितां धडपड करित आहेत. एकतंत्री राज्यपद्धतीखालीं असलेलीं हीं सर्व राष्ट्रें पारतंत्र्यांतून मुक्त होण्याची खटपट करीत आहेत. तर जगांतील उच्च संस्कृतीच्या अग्रस्थानीं असलेले व ब्रिटिश हिंदी साम्राज्याचे स्वतंत्र नागरिक या राज्यपद्धतीच्या जुवाखालीं मान देऊन स्वस्थ कसे राहूं शकतील? पृथ्वीवरील सर्व लोकांत उच्च संस्कारांचें बीं प्रथम पेरणाऱ्या भारतीय लोकांबद्दल अर्वाचीन राष्ट्रांना यत्किंचितहि कृतज्ञताबुद्धि वाटत नाहीं.

प्राचीन सुधारणेच्या अध्वर्यूंच्या जागीं असलेल्या हिंदी लोकांचे वंशज सध्यां जगभर पसरलेल्या स्वातंत्र्याच्या वातावरणांत ब्रिटिश बौद्धिक व तात्त्विक संस्कृतीला न शोभणाऱ्या अशा एकतंत्री रानटी राज्यपद्धतीखालींच राहणार काय?

## हक्क तिसरा-जमाखर्चाची न्याय्य वांटणी

या हक्काची मागणी पूर्ण करण्याकरितां विलंब लावण्याचें कारण नाहीं व शिक्षणानें लोकांच्या अंगीं योग्यता येण्याची वाट पहात बसण्याचेंहि कारण नाहीं. न्याय्य व योग्य असें हें कृत्य करण्याची ब्रिटिश राज्यकर्त्यांची इच्छा असल्यास स्वराज्याच्या मागणीपैकीं हा एक न्याय्य हक्क एकदम देण्यास कांहीं हरकत नाहीं. युरोपियन सैन्यावर होणारा खर्च ही यापैकीं अगदीं पहिली गोष्ट होय. सन. १८९० सालच्या ता. २५ मार्च रोजीं काढलेल्या खलित्यांत हिंदुस्थानसरकारनें पुढील उद्गार काढले आहेतः-

"हिंदुस्थानच्या संरक्षणाकरितां किल्लेकोट बांधण्यांत व डोळ्यास दिपवून सोडणारी लष्कराची भपकेदार तयारी करण्यांत लक्षावधि रुपये खर्च करण्यांत आले. देशांतील अंतर्गत शत्रूंचा नायनाट करण्याकरितां किंवा हिंदुस्थान

च्या आसपासच्या लढवय्या लोकांच्या स्वारीस प्रतिबंध करण्याकारितां हा खर्च करण्यांत आला असा कांहीं प्रकार नसून पौर्वात्य देशांतील ब्रिटिश वर्चस्व कायम राखण्याचाच यांत उद्देश होता."

आणखी एके प्रसंगीं हिंदुस्थानसरकारनें असें लिहून ठेविलें आहे कीं, हिंदुस्थानच्या संरक्षणाला पुरेल इतका साम्राज्याच्या लष्करापैकीं कांहीं भाग साम्राज्यसरकारनें येथें ठेवला आहे. त्याचा खर्च हिंदुस्थानच्या पैशांतूनच चालविण्यांत येतो. साम्राज्याच्या संरक्षणाकरितां ठेवलेलें रिझर्व्ह सैन्य या नात्यानें येथल्या या लष्कराची नेहमीं व्यवस्था ठेवण्यांत येते. साम्राज्यसंरक्षणाकरितां कराव्या लागणाऱ्या युद्धास आवश्यक असणाऱ्या सैन्याचा सोईस्कर रीतीनें उपयोग करतां यावा म्हणून हिंदी लष्करांतून हें सैन्य निराळें ठेवण्यांत येतें व विशेष हें कीं, हिंदुस्थान सरकारशीं मुळींसुद्धां संबंध नसलेल्या हिंदुस्थानाबाहेरच्या लढाया लढण्याकारतां हिंदी सैन्यहि नेण्यांत येतें आणि त्याच्या खर्चापैकीं यत्किंचितहि अंश मदत म्हणून हिंदुस्थानच्या खर्चास देऊन साम्राज्यसरकार सोशीत नाहीं.

हिंदुस्थानांतील युरोपियन सैन्य साम्राज्यसंरक्षणा-

करितां ठेवण्यांत आलेलें आहे, याबद्दल हिंदुस्थानसरकार-चाच असा पुरावा आहे.

प्रत्यक्ष इंडिया ऑफिसमध्येंच यासंबंधानें कोणत्या दृष्टीनें विचार करण्यांत येतो, हें मी आपल्यापुढें मांडतों.

सर जेम्स पील हे सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या कौन्सिलचे सभासद होते; व हिंदुस्थानच्या खर्चासंबंधानें विचार कर-ण्याकरितां बसलेल्या वेल्बी कमिशनमध्यें स्टेट सेक्रेटरीचे प्रतिनिधि या नात्यानें हजर होते. सर जेम्स पील यांनीं एका ठरावाचे वेळीं हिंदुस्थानांत लष्कराकरितां म्हणून खर्चण्यांत येणारे पैसे केवळ हिंदुस्थानच्याच संरक्षणा-प्रीत्यर्थ खर्च करण्यांत येत नाहींत, असें दाखवून त्यांनीं आग्रहपूर्वक असें प्रतिपादन केलें कीं,

"एका सामर्थ्यवान युरोपियन राष्ट्राच्या सरहद्दीशीं सर-हद्द लागलेल्या साम्राज्याचा हिंदुस्थान हा एक केवळ भाग असतांना साम्राज्याच्या ताब्यांतल्या या प्रदेशावर सर्व लष्करी खर्च लादणें कितपत न्यायाचें आहे, याचा विचार होणें महत्त्वाचें आहे.

हिंदुस्थानसरकारच्या व इंडिया ऑफिसमधील एका सभासदाच्या उताऱ्यावरून हिंदुस्थानांतील युरोपियन

लष्कराचा सर्व खर्च सर्वस्वीं ब्रिटिशसाम्राज्याकरितां आहे हें उघड दिसत असतांना खर्चाचा हा सर्व बोजा खमंगपणानें दुबळ्या हिंदी लोकांवरच ठेवण्यांत आला आहे. इंग्लंडांतील लोकांच्या हितसाधनार्थ होणारा इंग्लिश सरकारचा खर्चहि हिंदी लोकांवरच लादण्यांत येत असून इंग्लंडांत होणाऱ्या अशा प्रकारच्या खर्चापैकीं कोणताहि अंश वसाहती सोसत नाहींत. सर्वसाधारण न्यायबुद्धीनें पाहिलें तरी हा खर्च हिंदुस्थानावर लादण्यांत येऊं नये. हा अन्याय आहे. आणि आतां वास्तविक आमच्यावर लादण्यांत येऊं नये अशा या खर्चाच्या बोजांतून आमची सुटका झाल्यास आमच्या देशाचा वसूल सध्यां थोडा असला तरी शिक्षण वगैरे देशास अवश्य असलेल्या पुष्कळ सुधारणा करण्यास त्याचा पुष्कळ पुरवठा होईल. खर्चाच्या न्याय्य वांटणीचा हा साधा प्रश्न आहे. उघड व न्याय्य अशा तात्त्विक दृष्टीनें हा प्रश्न मीं आपल्यापुढें मांडला असून अशा दृष्टीनें विचार केल्यास हिंदुस्थानच्या सर्व गरजा भागविण्याकरितां लागणारे पैसे व लष्करी, आरमारी, मुलकी व इतर खात्यांत लागणारे लोक मिळण्यास कधींहि अडचण पडावयाची नाहीं. साम्राज्याचा

खर्च भागविण्याकरितां आमच्या ऐपतीप्रमाणें योग्य प्रमाणांत त्या खर्चाचा भाग आमच्याकडून घेण्यांत आला पाहिजे.

हे खर्चाच्या वांटणीचे न्याय्य संबंध एकदम ठरविण्यास कांहीं हरकत नाहीं. याकरितां खोळंबावयास नको किंवा कांहीं तयारी करावयास नको. या ठिकाणीं फक्त न्यायबुद्धीची मात्र गरज आहे. आणि शेवटीं स्वराज्याच्या हक्कासंबंधानें बोलावयाचें म्हणजे हिंदी लोकांसंबंधाचें कर्तव्य बजाविण्याचें ब्रिटिश लोकांनीं व मुत्सद्द्यांनीं ठरविण्यास अगदीं थोडक्या दिवसांत हिंदुस्थानच्या लोकांस स्वराज्याचे हक्क कसे द्यावे हें ठरविण्याइतकी मुत्सद्दीगिरी व शहाणपण त्यांच्यांत खात्रीनें आहे. इच्छा व सदसद्विवेकबुद्धीची चाड असल्यास मार्गहि आहे.

माझ्या स्वभावाची कसोटीनें पारख होण्याची वेळ आली अशा एका प्रश्नाकडे मी आतां वळतों.

गतकालच्या गोष्टी विसरून ब्रिटिश नागरिकाप्रमाणें हिंदी लोकांना स्वराज्याचे न्याय्य हक्क देण्याच्या कामीं ब्रिटिश मुत्सद्दी व सरकार आपल्या हातून शक्य असतील तेवढे प्रामाणिकपणानें प्रयत्न करतील अशा प्रकारचा

ब्रिटिशांच्या दिलदार व थोर स्वभावासंबंधानें तुम्हांला आज अर्ध्या शतकाच्या स्वतःच्या अनुभवावरून विश्वास वाटतो काय, असें गेलीं कांहीं वर्षें मला वारंवार विचारण्यांत येत असे.

सभ्य स्त्रीपुरुषहो, मी आपणांस या प्रश्नाचें सविस्तर व मोकळेपणानें उत्तर देतों.

स्वातंत्र्यप्राप्तीकरितां ब्रिटिश लोकांनीं केलेल्या चळवळीचा इतिहास वाचून व इंग्लिश लोकांचें उदार चारित्र्य व त्यांच्या अंगची अलौकिक बुद्धि पाहून माझ्या मनावर जे संस्कार झाले त्यांमुळें अगदीं मोकळ्या अंतःकरणानें बॉंबे असोसिएशन स्थापनेच्या आरंभीं मीं जें भाषण केलें त्यापैकीं एक लहानसा उतारा मी खालीं देत आहें.

"आमच्या हिताची प्रत्येक गोष्ट करण्यास आमचें सरकार मदत करण्यास तयार आहे असें दिसत असतां, आमच्या तक्रारींबद्दल उगीच कुरकूर करीत बसण्यापेक्षां आमच्या खऱ्या गरजा काय आहेत हें व्यवस्थित रीतीनें सरकारपुढें मांडणें अधिक श्रेयस्कर आहे."

मी असें देखील म्हणालों कीं,

"या असोसिएशनसारख्या एखाद्या असोसिएशननें

सरकारच्या एखाद्या कृत्याच्या बऱ्या वाईट परिणामासंबंधानें कडक रीतीनें चौकशी करून सरकारास अर्ज केल्यास आपलें दयाळू सरकार त्याकडे दुर्लक्ष करणार नाहीं."

अशा प्रकारचा माझा विश्वास होता; व त्या वेळच्या सुशिक्षित लोकांचा हा असा विश्वास असल्यामुळेंच, "इंग्रजी राज्यधोरणास जोरानें प्रतिरोध करणारे असूनहि, भारतवर्षांतील निरनिराळ्या राष्ट्रांच्या गरजांप्रमाणें राज्यकारभाराचें धोरण आंखण्याचे कामीं आम्हांला मनापासून साहाय्य करणारे लोक उच्च इंग्रजी शिक्षणाचा संस्कार झालेल्या हिंदी लोकांतच आढळतात, याबद्दल मला मोठें आश्चर्य वाटलें," असे सर बार्टल फ्रेअर यांनीं उद्गार काढले होते. आणि आतां तीं पवित्र वचनें न पाळल्यामुळें सुशिक्षित लोकांच्या भावनेंत किती फरक पडला आहे! राजकारणाच्या या चळवळीला अगदीं आरंभ केल्यापासून मी इतक्या वेळां निराश झालों आहें कीं, या निराशादुःखानें एखाद्याची छातीच फाटून गेली असती व तो इतका हताश बनला असता कीं, मला वाटतें त्यानें बंडच केलें असतें!

निराशेमुळें मला भोगावीं लागलेलीं दुःखें सर्वसामान्य

नसून तीं फार खडतर—हृदयाला घरें पाडणारीं—होतीं. सर्व-साधारणपणें एखाद्या मनुष्याला आपल्या प्रयत्नांत यश आलें नाहीं म्हणजे तो निराश होतो. परंतु पुष्कळ वेळां माझ्या प्रयत्नांत मला यश आलें. पण अधिकाऱ्यांनीं माझ्या या विजयाचें फळ मला चाखूं दिलें नाहीं! मीं म्हटल्याप्रमाणें अशा प्रकारचीं निराशाजनक दुःखें हीं एखाद्याचा हृदयस्फोट करण्यास पुरेशीं आहेत.

तरी मी निराश झालों नाहीं. मी निराश झालों नाहीं इतकेंच नव्हे, तर या वेळीं, तुम्हांला आश्चर्य वाटेल कीं, आशायुक्त भावनेनें तुमच्यापुढें उभा आहें! एका कारणा-करितां मी निराश झालों नाहीं. माझें अंतःकरण आशापूर्ण होण्यास तसेंच दुसरेंहि एक कारण आहे. माझ्या आयु-ष्यास आधारभूत झालेल्या एका इंग्रजी शब्दाच्या बळा-वरच मी अद्याप निराश झालों नाहीं. तो शब्द म्हणजे ( Persevere ) 'चिकाटी धर' हा होय. सर्व लहानमोठ्या प्रसंगांत शेवटपर्यंत तुम्हीं चिकाटी धरली पाहिजे. कोण-त्याहि एखाद्या विवक्षित मर्यादेपर्यंत जाऊन निराशेनें तुम्हीं आपल्या प्रयत्नांत खळ पडूं देतां कामा नये. तसें केल्यास तुमच्या प्रयत्नानें तुम्हांला जें कांहीं थोडेसें यश

आले असेल तें नाहींसें होईल इतकेंच नव्हे, तर आपल्या प्रयत्नास आरंभ करणेस देखील तुम्हांला फार जड जाईल. चळवळीच्या प्रत्येक विशेष परिस्थितींत योग्य अशा उपायांची योजना करण्यांत यावी; पण चळवळीचा उद्देश सिद्धीस जाईपर्यंत आपण चिकाटी धरली पाहिजे. जर आपलें ध्येय योग्य व न्याय्य आहे, आणि तें तसें आहे, तर शेवटीं आम्हांलाच खचित जय प्राप्त होईल, व म्हणूनच मी हताश झालों नाहीं.

इतक्या वेळां निराश होण्याचे प्रसंग येऊन सुद्धां या वेळीं माझें अंतःकरण आशापूर्ण होण्यास पुनरुज्जीवन (Rwival) हा शब्द कारणीभूत झाला आहे. व हें पुनरुज्जीवन म्हणजे हल्लींच्या ब्रिटिश राज्यकारभारांतील पुढारी मुत्सद्द्यांच्या मनांत झालेलें स्वतंत्र ब्रिटिश लोकसत्ताक संस्थांच्या स्वातंत्र्याच्या जुन्या उच्च संस्काराचें पुनरुज्जीवन होय. भविष्यकाळीं घडून येणाऱ्या प्रसंगांनीं त्या आशा, पूर्ण होतील कीं नाहीं हें जरी सांगतां येत नाहीं, तरी माझा विश्वास व आशा हीं भक्कम पायावर उभारलेलीं आहेत. हें सिद्ध करण्याकरितां हल्लींच्या कांहीं ठळक ठळक पुढाऱ्यांचे उद्गार मी आपल्याला वाचून

दाखवितों, म्हणजे झालें.

सर हेनरी कॅंबेल बॅनरमनः—

"स्वराज्याच्या तत्त्वावर आमची श्रद्धा आहे. केवळ नाइलाज झाला म्हणून किंवा ब्रिटिशसाम्राज्यानें दुर्दैवानें व अजाणतेपणानें स्वीकारलेला सिद्धान्त म्हणून आम्ही या तत्त्वाला चिकटून राहतों असें नसून, स्वराज्याचें हें तत्त्व म्हणजे ईश्वरी प्रसाद आहे. प्रजेच्या मनांतील सर्व जखमा बऱ्या करण्याचें, प्रजेला संतुष्ट ठेवण्याचें यांत सामर्थ्य आहे. म्हणूनच या तत्त्वाचा आम्ही अंगीकार करतों. स्वराज्याच्या उच्च गुणावर माझी पूर्वीप्रमाणेंच दृढ श्रद्धा आहे. स्वराज्य आणि लोकसत्ता या तत्वांवरच माझा विश्वास आहे."

मि. जॉन मोर्लें:-

"आज घटकेपर्यंत इंग्लिश लोकांनीं मानलेल्या या पवित्र 'स्वतंत्र' शब्दांत मनुष्याच्या हृदयांत उच्च मनोवृत्ति उचंबळवून सोडण्याचें सामर्थ्य आहे."

"सुराज्याच्या तत्त्वाचें बीज हें अधिकारी किंवा अरेरावी सत्तेंत सांपडावयाचें नसून तें लोकांच्या हृदयांत

लीन असलेल्या स्वतंत्र व यदृच्छेनें उत्पन्न होणाऱ्या उच्च भावनांतच आढळून येईल."

सध्यांच्या उदारमतवादी मुत्सद्द्यांच्या मनांत ब्रिटिश परंपरेस उचित असलेल्या स्वातंत्र्याच्या व उदारमतवादित्वाच्या भावना जागृत झालेल्या पाहून माझें अंतःकरण आशापूर्ण झालें असून सध्यांची अनिष्ट राज्यपद्धति नाहींशी होऊन हिंदुस्थानांत लवकरच स्वराज्याचें व स्वातंत्र्याचें उच्च व पवित्र भावनांनीं युक्त असलेलें उदार धोरण सुरू होईल असें मला वाटूं लागलें आहे. योग्य कारणामुळेंच मला असा विश्वास वाटूं लागला असून माझें अंतःकरण आशापूर्ण झालें आहे.

सभ्य स्त्रीपुरुषहो! ब्रिटिश लोकांची इभ्रत, त्यांचें पुण्यशालित्व, त्यांची न्यायबुद्धि या गुणसमुच्चयांत असलेल्या नैतिक सामर्थ्याचा आम्हांला पाठिंबा आहे; पण आमचे जन्मसिद्ध व वचनदत्त हक्क यांचा आम्हांला विसर पडला असून प्लेग, दुष्काळ, अपमान, दारिद्र्य यांमुळें दुःखानें होरपळणाऱ्या आमच्या देशांतील सर्वसामान्य जनतेची यांतून मुक्तता करण्याची अत्यंत आवश्यकताहि आम्हांला भासत नाहीं व त्यांच्याबद्दल आमच्या

मनांत भूतदयाहि जागृत होत नाहीं. आमचे जन्मसिद्ध हक्क ओळखून आणि आपल्या लोकांची दुःखस्थिति पाहून उत्पन्न झालेल्या नैतिक सामर्थ्याच्या बळावर जर आम्ही चळवळ करूं लागलों तर ब्रिटिश लोकांसारख्या लोकां· वर त्याचा परिणाम होईल व आम्ही खात्रीनें यशस्वी होऊं. इंग्लिश लोकांपासून आम्हीं जें काय शिकावयाचें तें हेंच कीं, शांततेनें पण उत्साहपूर्वक चालविलेल्या सभा, मिरवणुकी, अर्ज वगैरे मार्गांनीं अत्यंत चिकाटीनें व मोठ्या प्रमाणावर चळवळ चालविणें हें होय. आम्हांस साहाय्य-कारक असलेल्या आमच्या हक्कांचा व नैतिक सामर्थ्याचा आम्हीं अव्हेर करतां उपयोगी नाहीं.

आमच्या उन्नतीविषयीं आशाजनक असे उद्गार सध्यांच्या कारकीर्दीतील कांहीं पुढाऱ्यांनीं काढले असून आमच्या पक्षास अधिक अधिक पार्लमेंटचे सभासद, इंग्लिश वर्तमानपत्रकार व वक्ते मिळाले आहेत. इंडियन पार्लमेंटरी कमिटींत सध्यां २०० सभासद असून पार्लमें-टांतील मजूर आयरिश नॅशनॅलिस्ट व रॅडिकल पक्षाचे बरेच सभासद हिंदी लोकांच्या प्रश्नांसंबंधानें सहानुभूति बाळ-गणारे आहेत. ट्रायब्यून, डेली न्यूज, मॉर्निंग लीडर, मँचे-

स्टर-गार्डियन, स्टार, डेली क्रॉनिकल, जस्टिस, इन्व्हेस्टर्स रिव्ह्यू, रेनॉल्डस्, न्यू एज, हीं व अशींच दुसरीं कित्येक पत्रें हिंदुस्थानच्या हक्कांसंबंधानें व गरजांसंबंधानें न्यायबुद्धीनें विचार करणारीं आहेत. आमचें 'इंडिया' पत्र आम्हांला वजनदार केलें पाहिजे. लेबर, डेमोक्रॅटिक, ब्रिटिश नॅशनॅलिस्ट, रॅडिकल, लिबरल या पक्षांतील पुष्कळ सभासद हिंदी लोकांच्या प्रश्नासंबंधानें अधिकाधिक विचार करूं लागले आहेत. ऐहिक सुखापेक्षां व चैनीपेक्षां सदसद्विवेकबुद्धीची व उदार चारित्र्याची अधिक चाड असलेल्या ब्रिटिश जनतेपैकीं पुष्कळ लोकांच्या मनांत दुःसह संकटांनीं व दारिद्र्यानें गांजलेल्या हिंदी लोकांसंबंधाच्या आपल्या कर्तव्याबद्दल जागृति उत्पन्न झाली आहे. मी जेव्हां पार्लमेंटचा सभासद होतों आणि हिंदी सभासद असा फक्त मी एकटाच होतों, त्या वेळीं आयरिश, रॅडिकल व लेबर पक्षांच्या सभासदांची मला मदत होती. एकाकी व असहाय असें कधींहि मला वाटलें नाहीं; व माझ्या पुष्कळ प्रयत्नांत मला यश मिळालें. स्वराज्याचे हक्क मिळेपर्यंत पुष्कळ हिंदी लोक पार्लमेंटचे सभासद झाले पाहिजेत. अशा अनुकूल परिस्थितींत आ-

पल्या राजकीय उन्नतीकरितां आपल्यास मिळालेल्या संधीचा आपण शक्य तितका फायदा घेतला पाहिजे. त्याचबरोबर आपली सामाजिक व औद्योगिक प्रगति करून घेण्याकरितां आपल्या हातांत असतील तितके उपाय केले पाहिजेत हेंहि खरें आहे. परंतु आपल्या राजकीय उन्नती-करितां प्रयत्न करीत असतां हताश होण्याचे अनेक प्रसंग येतील हें जरी मला कबूल आहे, तरी आपल्या आजपर्यं-तच्या प्रयत्नांच्या अंतीं सुदैवानें आम्हांला प्राप्त झालेल्या संधीचा आपण उपयोग करून न घेतल्यास आमच्या पदरीं मूर्खपणा येऊन आमच्यासारखे मंदभागी आम्हीच असें मात्र ठरेल. ब्रिटिश लोकांच्या स्वराज्य व स्वातंत्र्य-प्रीतीवर व ब्रिटिश नागरिकत्वाचे हक्क आम्हांला देण्या-संबंधाच्या त्यांच्या सत्यवादित्वावरच माझा भरंवसा आहे. माझ्या उरलेल्या आयुष्यांत कर्तव्यनिष्ठ, निष्कपट व थोर मनाच्या आणि सदसद्विवेकबुद्धीची चाड असलेल्या ब्रिटिश लोकांनीं हिंदुस्थानास स्वराज्याचे हक्क देण्याचें धोरण स्वीकारलेलें व हे हक्क पूर्णत्वानें देण्याच्या प्रयत्नास एक-दम आरंभ केलेला मी पाहीन अशी मला आशा आहे.

हिंदुस्थानच्या उन्नतीसंबंधानें मला कां आशा वाटत

आहे याचीं कारणें मीं आपल्यास आतां सांगितलीं. आणि जगताच्या आदि शक्तीच्या ठिकाणीं असलेल्या ईश्वरी सूत्रानेंहि आमच्या कल्याणांतच इंग्लंडचें अत्यंत कल्याण आहे असेंच ठरलें आहे. ब्राइटसाहेबांनीं दूरदर्शीपणानें एकदां असें म्हटलें होतें कीं, "हिंदुस्थानचें हित होण्यांतच इंग्लंडचें कल्याण आहे. इंग्लंडचें वैभव वाढावयाचें असेल तर हिंदुस्थानचें वैभव प्रथम वाढलें पाहिजे."

मोर्लेसाहेब एकदां असेंच म्हणाले होते कीं, कायद्यानें घडवून आणलेलें एखादें न्यायकृत्य त्याची व्यापकता कितीहि माफक असली तरी तशा प्रकारचीं अनेक अदृश्य कृत्यें घडवून येण्यास कारणीभूत होतें.

स्वराज्याचे हक्क मिळाल्यामुळें वसाहतींना जसें वैभव प्राप्त करून घेतां आलें त्याचप्रमाणें स्वराज्यामुळें मिळणारें ऐश्वर्य प्राप्त करून घेण्यास हिंदुस्थानासहि मुभा मिळाल्यास, ब्रिटिश साम्राज्यांतील नागरिकांना आपलें कल्याण करून घेण्याचा व कीर्ति संपादन करण्याचा केवढा तरी मोठा मार्ग सांपडेल व खऱ्या संस्कृतीच्या ईश्वरी सत्तेच्या वर्चस्वाचें प्रत्यंतर व उदाहरण म्हणून मनुष्यजातीपुढें ठेवतां येईल.

आम्हांस स्वराज्यप्राप्तीच्या मार्गास लावण्याचें कर्तव्य आम्ही हल्लींच्या ब्रिटिश मुत्सद्दयांवर जसें लादतों त्याचप्रमाणें त्यांनाहि मदत करण्याचें आमचें कर्तव्य आहे. ही मदत दोन प्रकारांनीं करतां येईल. त्यांपैकीं पहिला प्रकार हा कीं, स्वराज्याचे हक्क कसे उपभोगावे व त्यांची अमलबजावणी कशी करावी याबद्दलच्या लोकांच्या गैरसमजुती नाहींशा करणें; व दुसरा हा कीं, ब्रिटिश नागरिकाचे हक्क प्राप्त करून घेणें ही आमची न्याय्य मागणी आहे, अशी ब्रिटिश लोकांची खात्री करून द्यावी.

विचाराकरितां माझ्या कांहीं सूचना मी कॉंग्रेसपुढें ठेवतों. आमच्या हक्काच्या मागणीचा हा अर्ज (Petition of rights) आपण योग्य शब्दांनीं बादशहापुढें, हाउस ऑफ कॉमन्सपुढें व लॉर्डांच्या सभेपुढें मांडला पाहिजे. १६८९ च्या ब्रिटिश बिल ऑफ राइटस्‌च्या ५ व्या कलमाप्रमाणें प्रजेला बादशहाला अर्ज करण्याचा हक्क आहे.

माझी दुसरी सूचना अशी आहे कीं, हिंदुस्थानांतील मातब्बर लोकांनीं देशाभिमानाचा एक फंड उभारावा. या फंडाच्या साहाय्यानें कर्त्या पुरुषांचा व उत्तम वक्त्यांचा एक संघ आम्हांला निर्माण करतां येईल व देशांतील

कानाकोपऱ्यांत जाऊन तेथील लोकांना त्यांच्या भाषेंत ब्रिटिश नागरिकांचे हक्क कोणते, ते कसे संपादन करावे व त्यांचा उपभोग कसा घ्यावा याचें ज्ञान देतां येईल. त्याच-प्रमाणें इंग्लंडांतहि सर्व ठिकाणीं प्रवास करून, मोठमोठ्या सभा भरवून ब्रिटिश लोकांना असलेले स्वराज्याचे हक्क आम्हांला मिळाले पाहिजेत व ही आमची मागणी न्यायाची आहे, अशी ब्रिटिश जनतेची खात्री करून देण्यास कर्ते व वजनदार वक्ते इंग्लंडास पाठवितां येतील. असें केल्यास माझी खात्री आहे कीं, ब्रिटिश लोकांची कर्तव्यबुद्धि जागृत होऊन ते शक्य तितकें लवकर हिंदुस्थानास स्वराज्याचे हक्क देण्याचे कामीं हल्लींच्या ब्रिटिश मुत्सद्द्यांना मदत करतील. हिंदुस्थान व इंग्लंड या दोन्ही ठिकाणींहि आपण जोराची चळवळ केली पाहिजे. कॉर्न लॉविरुद्ध इंग्लंडांत मोठी जोराची चळवळ झाली व ही चळवळ चालविण्यास मला वाटतें वीस लाख रुपये खर्च झाला. अशाच रीतीनें चळवळ करून आपल्या पायावर आपण उभें राहण्यास शिकलें पाहिजे.

या कॉंग्रेसपुढें दोन प्रकारचीं कर्तव्यें आहेत, असें मीं आरंभींच सांगितलें आहे. या दोहोंपैकीं मुख्य व महत्वाचें

कार्य म्हणजे मागें पुढें स्वराज्याच्या हक्कांची परिपूर्तता होईल अशा धोरणानें सध्यांच्या राज्यपद्धतींत फेरफार घडवून आणण्याबद्दल मागणी करणें हें होय.

दुसरें काम म्हणजे, सध्यांची राज्यपद्धति जोंपर्यंत आहे तोंपर्यंत तींतील अपरिहार्य दिसणाऱ्या व अनुपयोगी उणीवा देशहिताला विघातक न होण्याबद्दल दक्षतेनें खटपट करणें हें होय. हल्लींची राज्यपद्धति मुळांतच सदोष असल्यामुळें तिच्यापासून स्वभावतःच आणखी निरनिराळे दोष उत्पन्न होत आहेत. हिंदुस्थानाला स्वराज्य मिळेपर्यंत सध्यांच्या राज्यपद्धतींतील दोष व परिणामीं त्यापासून उत्पन्न होणारीं दुःखें नाहींशीं होणार नाहींत हें जरी खरें आहे, तरी या दोषांवर नजर ठेवून स्वराज्याचे हक्क प्राप्त होईपर्यंत शक्य तितकी त्यांत सुधारणा करण्याचें कॉंग्रेसचें कर्तव्य आहे. कॉंग्रेस हें आपलें कर्तव्य आज गेलीं एकवीस वर्षें करीत असून सध्यांच्या अस्वाभाविक व उधळपट्टीच्या राज्य-कारभारांत शक्य तितकी सुधारणा होण्यास आवश्यक असलेले निरनिराळे ठराव विषयनियामक कमिटी आप-ल्यापुढें मांडील. मीं तुम्हांला अधिक त्रास दिला नसता; पण कॉंग्रेसच्या कर्तव्यांपैकीं या दुसऱ्या भागांतील वंग-

भंग व स्वदेशी चळवळ या दोन विषयांसंबंधानें मला दोन शब्द सांगावयाचे आहेत.

वंगभंगाच्या संबंधांतील चळवळ व चळवळ करणारे लोक यांसंबंधानें बोभाटा माझ्या कानीं आला आहे. इंग्लंडच्या राजकीय, सामाजिक व औद्योगिक प्रगतीच्या इतिहासाचा चळवळ हा आत्मा आहे. चळवळीनेंच इंग्लिश लोकांनीं एवढी कीर्ति, एवढें ऐश्वर्य व स्वातंत्र्य संपादन केलें. आणि थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे जगांतील सर्व राष्ट्रांत अग्रस्थान पटकावलें. इंग्लिश लोकांचें सर्व आयुष्य, एवढेंच नव्हे, तर त्यांचा रोजचा दिनक्रम, म्हणजे केवळ चळवळ आहे. सकाळीं उठल्याबरोबर तुम्ही जें वर्तमानपत्र उघडाल त्यांत पहिल्यापासून शेवटपर्यंत चळवळीशिवाय तुम्हांला कांहीं दिसावयाचें नाहीं. कॉंग्रेसा, परिषदा, सभा, ठराव अशा हजारों स्थानिक व राष्ट्रीय चळवळी तुम्हांला दिसून येतील. एखाद्या हलक्या दर्जाच्या राजकीय विषयांत पडलेल्या मनुष्यापासून तों मुख्य प्रधानांपर्यंत आपल्यास पाहिजे असलेली प्रत्येक गोष्ट साध्य करून घेण्याबद्दल चळवळ करणें हा त्यांचा धंदाच आहे. इंग्लंडांतील पार्लमेंट, वर्तमानपत्रें, वक्तृत्वपीठें हीं सर्व म्हणजे केवळ चळ-

वळ आहे. चळवळ हें सुधारलेल्या काळांतील नैतिक साम-र्थ्यानें युक्त असें शांततेचें शस्त्र असून शक्य त्या वेळीं अविचारयुक्त मानवी सशस्त्र प्रतिकारापेक्षां अनंत पटींनें परिणामकारक आहे. परंतु या चळवळींच्या कामांत हिंदी वर्तमानपत्रकर्ते म्हणजे केवळ मॅट्रिक असून आंग्लो-इंडियन वर्तमानकर्ते ब्रिटिश चळवळ्यांच्या युनिव्हर्सिटींतील एम्. ए. आहेत. हिंदी वर्तमानपत्रकर्ते हे आंग्लो-इंडियनांच्या विद्यार्थ्यांच्या जागीं असून हे आपले विद्यार्थी आपल्यास मिळालेल्या शिक्षणाबद्दल आपल्या गुरूंना श्रेय देण्यास तयार आहेत, याबद्दल आंग्लो इंडियनांना अभिमान वाटला पाहिजे. यासंबंधानें एखाद्या इंग्लिश मुत्सद्द्याचें काय म्हणणें आहे हें सांगितल्यास त्यानें अधिक लवकर समजूत पडेल.

मेकॉलेसाहेब एकदां आपल्या एका भाषणांत म्हणाले कीं, "इंग्लंडांत ज्या बऱ्याच उपयुक्त सुधारणा झाल्या त्यांचें सर्व श्रेय चळवळींकडे आहे असें माझें मत आहे. या सुधारणा दुसऱ्या कोणत्याहि उपायानें अस्तित्वांत आल्या नसत्या. लोकसत्ताक राज्यांत चळवळ ही अपरिहार्य गोष्ट आहे. गुलामांचा व्यापार चळवळीशिवाय नाहींसा झाला

असता काय ? गुलामगिरीची पद्धत सुद्धां चळवळीशिवाय कधीं तरी नाहींशी झाली असती काय ? "

इंग्लंडांतील स्थानिक व राष्ट्रीय अशा शेंकडों चळवळींचें पार्लमेंटला अर्ज, मिरवणुकी, सभा हें मुख्य शस्त्र आहे. हे अर्ज करण्यांत कोणी कोणावर उपकार करावे म्हणून याचना करण्याचा कांहीं प्रकार नसून पत्रांत औपचारिक रीतीनें 'Your obedient servant' म्हणून लिहिल्यानें जसा कोणी कोणाचा चाकर म्हणून मानला जात नाहीं, तशापैकींच हाहि प्रकार आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत दाद पोंचविण्याचा हा एक औपचारिक मार्ग आहे. हे अर्ज म्हणजे सुधारणा घडवून आणण्याकारितां केलेल्या आपल्या हक्काच्या न्याय्य मागण्या असून एखाद्या विशिष्ट गोष्टीसंबंधानें बहुजनसमाजाचें काय मत आहे, हें पार्लमेंटच्या नजरेस आणून त्यावर वजन पाडण्याकरितां केलेले असतात. आतांपर्यंत आपण केलेल्या प्रयत्नांस यश आलें नाहीं याचें खरें कारण, आपण वाजवीपेक्षां जास्त अर्ज केले असें नसून आपण फारच कमी अर्ज केले हें आहे. एखाद्या प्रश्नास पार्लमेंटमध्यें महत्त्व येतें, हा, लोक त्या प्रश्नाचा फारच कळकळीनें विचार करीत

आहेत, याचा पुरावाच आहे. स्त्रियांना मत देण्याच्या हक्का-
विरुद्ध कारणें सांगतांना, "स्त्रियांना बहुमतानें हा हक्क पाहिजे
आहे अशी कळकळ दर्शविणारा पुरेसा पुरावा मला आढळून
आला नाहीं," असें मि.अस्क्विथ नुक्ते परवांच म्हणाले. तसेंच
आपल्या मागण्यांसंबंधानें आपण पुरेशी चळवळ केली नाहीं
किंवा अर्ज केले नाहींत. प्रत्येक महत्त्वाच्या बाबीसंबंधानें
हिंदुस्थानच्या प्रत्येक भागांतून लाखों सह्यांचे लाखों अर्ज
आपण पार्लमेंटला केले पाहिजेत. इंग्लंडांत नुक्तेंच घडून
आलेलें उदाहरण म्हणजे एज्युकेशन बिलाविरुद्ध चर्च
पार्टीनें गेल्या आक्टोबरच्या आरंभापर्यंत १४०० वर
सभा भरविल्या व ७,५०,००० सह्यांचा अर्ज पार्लमेंटास
केला व पुष्कळ मिरवणुका काढल्या हें होय. तेव्हांपासून
त्यांच्या चळवळींत सारखी भर पडत आहे. जॉन बुल-
पासून न्याय मागण्याची खरी खरी इच्छा असल्यास चळ-
वळ करा, हिंदुस्थानच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत
हिंदुस्थानच्या प्रत्येक कानाकोपऱ्यांत जाऊन अर्थात्
शांततेच्या मार्गांनीं चळवळ करा. आपल्या हक्काच्या
प्राप्तीसंबंधानें आपल्याला अत्यंत कळकळ वाटत आहे,
अशी त्यांची खात्री करा. मला सांगावयास आनंद वाटतो

कीं, बंगाली लोक हा धडा शिकले असून त्यांनीं या चळवळीच्या कामीं पुढाकार घेतला आहे. पैशाच्या दृष्टीनें स्वार्थत्याग करण्याचा व कळकळीनें सार्वजनिक काम करण्याचा हा धडा सर्व हिंदुस्थाननें गिरवला पाहिजे.

चळवळ करा! चळवळ करा! म्हणजे समजून द्या. समजून द्या! म्हणजे आपले कोणते हक्क आहेत व ते कां व कशाकरितां मिळविले पाहिजेत, हें हिंदी लोकांना समजून द्या व ब्रिटिश लोकांनाहि हिंदी लोकांचे कोणते हक्क आहेत व ते त्यांना कां दिले पाहिजेत, हें समजावून द्या. आपण जर आपल्या हक्कांसंबंधानें बोललों नाहीं तर आपण आहे त्यांत संतुष्ट आहों असें ते म्हणतात. बरें, आम्ही बोलूं लागलों कीं, आम्ही चळवळे लोक म्हणून आम्हांला नांवें ठेवण्यांत येतात. हिंदी लोकांनीं सनदशीर मार्गानें चळवळ करावी असें सांगण्यांत येतें आणि सरकार मात्र बेसनदशीर आणि अरेरावीच्या पद्धतीनें आपला कारभार चालवीत आहे.

चळवळीच्या संघटनेसंबंधानें माझी अशी सूचना आहे कीं, देशाच्या सर्व प्रांतांत राजकारणाचा उपदेश करणारे मिशनरी पाठवावे; म्हणजे हे मिशनरी ब्रिटिश नागरिकां-

मराठी ग्रंथ संग्रहालय
५१ ग्रा. क्र. १४०२

प्रमाणें हिंदी लोकांचेहि कोणते हक्क आहेत हें लोकांना समजावून देतील. अर्ज करून या हक्कांची मागणी करण्यास ते त्यांना तयार करतील आणि जेव्हां हे हक्क मिळतील तेव्हां त्यांची अंमलबजावणी कशी करावी व त्यांचा उपभोग कसा घ्यावा हें त्यांना शिकवतील.

**स्वदेशी** ही केवळ आजची गोष्ट नाहीं. गेल्या पुष्कळ वर्षांपासून मुंबई इलाख्यांत ही चळवळ सुरु झाली आहे. मी खुल्या व्यापारी तत्त्वाचा पुरस्कर्ता आहें. आज वीस वर्षें कॉबडेन क्लबच्या कायकारी कमिटीचा मी सभासद असलों तरी माझें अद्यापि सांगणें आहे कीं, हिंदुस्थानच्या सांपत्तिक व्यवहारांत हिंदी लोकांच्या परिस्थितीला सर्वथा अयोग्य अशा सध्यां चालू असलेल्या गोंधळामुळें हिंदुस्थानांत स्वदेशी तत्त्वाची सक्तीनें अंमलबजावणी करणें अत्यंत अवश्य झालें आहे. हिंदमातेच्या लेंकरांना दारिद्र्यांत कुचंबत ठेवून व त्यांच्याकडून परदेशच्या लोकांचे पगार व पेन्शनें चालविण्याकरितां २०००००००० रु. घेण्याची जरूरी जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत हिंदुस्थानला अर्थशास्त्राचीं तत्त्वें लागू करूं पाहणें म्हणजे त्याच्या दुःखावर आणखी डागण्या देण्यासारखेंच आहे. मी एखाद्या इंग्लिश गृहस्थाला

असें विचारतों कीं, दीडशें वर्षे तर राहूं द्याच पण हिंदुस्थानच्या सांपत्तिक बाबींतील परिस्थितीला अयोग्य व अस्वाभाविक असा चाललेला हा गोंधळ इंग्लिश लोकांना एक दिवस तरी खपला असता काय? नसता—कधींहि नसता! इंग्लिश लोकांना तो कधींहि खपला नसता! मीं पूर्वींच दिलेल्या मोर्लेसाहेबांच्या अवतरणाप्रमाणें सांपत्तिक बाबतींतील या अन्यायमूलक ढवळाढवळीमुळें आमच्या राष्ट्रीय अस्तित्वाच्या मर्मावर, अंतःकरणावर व प्रत्यक्ष जीवितावरच घाला पडला आहे.

हिंदी लोकांच्या आवश्यक कर्तव्यांपैकीं ज्यांचा मीं आतांपर्यंत उल्लेख केला, त्यांपैकींच एका कर्तव्यासंबंधानें मी जरी शेवटीं बोलत आहें, तरी तें कमी महत्त्वाचें आहे असें मात्र नाहीं. हें कर्तव्य म्हणजे हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जातींचें व वर्गांचें राजकीय दृष्टीनें ऐक्य होणें हें होय. पदर पसरून सर्वांना मी हें ऐक्याचें मागणें मागत आहें! मला हवा तर भिकारी म्हणा; पण कोणत्याहि सत्कृत्याकरितां किंवा तें साध्य करून घेण्याच्या कामीं गरज पडल्यास मला भिक्षा मागण्याचीहि लाज वाटत नाहीं. सर्वस्वीं ब्रिटिश लोकांच्या हातीं असलेल्या गोष्टींबद्दल

मी ज्याप्रमाणें त्यांच्याजवळ मागणें करतों, त्याचप्रमाणें हिंदी लोकांच्या हातीं असलेल्या या गोष्टीबद्दलहि मी त्यांच्याजवळ मागणें मागत आहें. राजकीय हेतूंकरितां हिंदुस्थानांतील सर्व लोकांनीं एकदिल व्हावें हें मागणें विशेषतः माझ्या मुसलमान बंधूंपाशीं मी मागत आहें. मुसलमानांचा समाज मोठा आहे. हिंदुस्थानांत व त्याबाहेरच्या प्रांतांत ते राज्य करित होते व सध्यांहि करीत आहेत. निजामासारखे हिंदुस्थानांतील सर्वांत बड्या संस्थानाचे अधिपति त्यांच्यांत असून इतर मुसलमान संस्थानिकांत जुनागड, राधनपूर, भोपाळ, वगैरे बडे बडे संस्थानिक त्यांच्यांत आहेत.

शिक्षणाच्या बाबतींत ते मागसलेले असले तरी १८६० च्या सुमारास बद्रुद्दीन तय्यबजी व कमरुद्दीन तय्यबजीसारखे हुशार बॅरिस्टर व सालिसिटर त्यांच्यांत झाले आहेत. मुंबईच्या व्यापारापैकीं केवढा तरी मोठा भाग मुसलमानांच्या हातीं आहे, हें सर्वप्रसिद्ध आहे. आपल्या जातींत शिक्षणाचा प्रसार करण्याचा त्यांचा मुख्य हेतु व प्रयत्न असला पाहिजे. या कामाकरितां सयद अहमद व न्या. तय्यबजी यांनीं अत्यंत परिश्रम घेतले आहेत.

एकदां या बाबतींत ते हिंदु लोकांशीं बरोबरी करूं लागले म्हणजे सुधारणेच्या मागें पडण्याच्या भीतीचें कांहींहि कारण उरणार नाहीं. आपल्या पायावर आपण उभें राहण्याची व आयुष्यांतील अनेक प्रकारच्या कर्तबगारींत योग्य वांटा पतकरण्याइतकी त्यांच्यांत योग्यता, उत्साह व बुद्धिमत्ता आहे. सरकारी नोकरी हा त्या कर्तबगारींतला एक लहानसा अंश आहे. सरकारी नोकरी म्हणजे कांहीं सर्वस्व नव्हे.

माझ्या मताला कांहींहि किंमत असली तरी मुसलमानांत शिक्षणाच्या प्रसाराकरितां सरकारनें शक्य ते प्रयत्न करावे अशी सरकारपाशीं माझी मनापासून मागणी आहे. एकदां स्वराज्य मिळाल्यावर हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या लोकांची सांपत्तिक स्थिति सुधारेल. पण तोंपर्यंत याबद्दलची आशाहि करण्यांत अर्थ नाहीं. म्हणूनच स्वतःच्या उन्नतीकरितां हिंदुस्थानांतील सर्व जातींचें पूर्ण ऐक्य होणें अत्यंत जरूर आहे.

राजकीय परिस्थितीच्या दृष्टीनें आपण सर्व लोक एकाच नावेंत बसलों आहोंत. आपणां सर्वांना एकत्रच तरलें पाहिजे किंवा बुडालें पाहिजे. या ऐक्याशिवाय सर्व प्रकारचे

प्रयत्न व्यर्थ जातील. एकत्र असूं तर जगूं, विभक्त झालों तर मरून जाऊं. “United we stand, divided he fail” ही नेहमींची म्हण आहे. पण ह्यांत पुष्कळ अर्थ भरला आहे.

मुसलमानांतील प्रसिद्ध राष्ट्रभक्त पुढारी सर सय्यद अहमद एकदां असें म्हणाले होते कीं, हिंदु व मुसलमान हे हिंदभूमीचे दोन नेत्र आहेत. एकाला धक्का लागल्यास उगेच दुसऱ्या डोळ्यांतून पाणी येईल. आपण हिंदु व मुसलमान अंतःकरणानें, प्राणानें व कृतीनें एक होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जर आपण एक असूं तर आपणांला एकमेकांना साह्य करतां येईल. नाहीं तर परस्परविद्वेषाचा परिणाम आपल्या दोघांच्याहि नाशास कारणीभूत होईल. ‘हिंदी राष्ट्र’ या शब्दांत मी हिंदु व मुसलमान या दोघांचाहि समावेश करतों. याशिवाय या शब्दांचा दुसरा अर्थच संभवत नाहीं.

त्या थोर पुरुषाचा अशा प्रकारचा हा शहाणपणाचा व स्वदेशाभिमानपूर्ण उपदेश होता. व हा उपदेश माझे मुसलमान बंधु अंतःकरणांत वागवतील अशी मला आशा आहे. मी पुन्हां एकवार सांगतों कीं, कोणत्याहि प्रकारचा

अडथळा न येतां आमची उन्नति होण्यास हिंदुस्थानांतील सर्व लोकांचें ऐक्यच झालें पाहिजे.

आपल्यापैकीं प्रत्येकानें सर्वांशीं एकमतानें राहून स्वराज्याच्या सर्वसामान्य ध्येयप्राप्तीकरितां आपलें शक्तिसर्वस्व खर्चीं घालावें.

शेवटीं सांगावयाचें म्हणजे सामाजिक सुधारणा किंवा औद्योगिक प्रगति या प्रत्येक चळवळींत कळकळीनें काम करणारी माणसें पाहिजे आहेत. ही प्रत्येक चळवळ अगदीं वेगवेगळ्या रीतीनें व एकनिष्ठपणानें चालविली पाहिजे. राजकीय, सामाजिक व औद्योगिक या तिन्ही चळवळी एकाच वेळीं व सारख्याच कळकळीनें चालविल्या पाहिजेत. एका चळवळींतील प्रगतीचा दुसऱ्या दोन्ही चळवळींवर परिणाम होईल. राष्ट्राचा थोरपणा, त्याचें सामर्थ्य, त्याची महत्त्वाकांक्षा या सर्वांचें मूळ राजकारणाच्या उच्च तत्त्वांतच आहे, असे मोर्ले यांनीं खऱ्या अंतःकरणानें व सूक्ष्म विचारपूर्वक उद्गार काढले होते. त्याचप्रमाणें मोर्लेसाहेबांच्या दुसऱ्या एका महत्त्वाच्या वचनाची मी आपल्यास पुन्हां आठवण करून देणार आहें. त्यांत तर हिंदी राजकारणाच्या प्रश्नाचा सर्वथैव अंतर्भाव झाला

आहे. ते म्हणतात, "सांपत्तिक व्यवहारांत अन्यायानें ढवळाढवळ करणें म्हणजे आमच्या राष्ट्राच्या प्रत्यक्ष मर्मावर, अंतःकरणावर व जीवितावर घाला घालण्यासारखें आहे."

सांपत्तिक व्यवहारांतील अन्यायमूलक ढवळाढवळ हीच हिंदुस्थानच्या दैन्यास कारणीभूत झाली आहे. याला एकच उपाय म्हणजे राष्ट्राचा थोरपणा, सामर्थ्य व महत्त्वाकांक्षा यांच्या मुळाशीं राजकारणांतील उच्च तत्त्वेंच आहेत आणि या राजकारणांतील उच्च तत्त्वांचा स्वराज्यांत अंतर्भाव होतो. म्हणून स्वराज्य हाच एक निर्वाणीचा व मुख्य उपाय आहे. आमच्या आकांक्षा, आमचें सामर्थ्य, आमचा थोरपणा हीं सर्व स्वराज्यावरच अवलंबून आहेत.

सभ्य स्त्रीपुरुषहो! माझें कर्तव्य मीं केलें आहे. माझ्या राहिलेल्या आयुष्यांत सुदैवानें कोणत्या शुभ गोष्टी मला पहावयास सांपडतील हें मला ठाऊक नाहीं. परंतु माझ्या देशावरच्या भक्तीमुळें व प्रेमामुळें मी माझ्या देशबांधवांना एकच शब्द सांगतों. एकी करा, चिकाटी धरा! दारिद्य, दुष्काळ व प्लेग यांच्या उदरांत गडप होणाऱ्या लाखों लोकांचें संरक्षण करण्याकरितां, तसेंच तुटपुंज्या

अन्नसामग्रीवर अर्धपोटी राहणाऱ्या कोट्यवधि हिंदी लोकांची खडतर आपत्ति दूर करण्याकरितां व जगांतील सामर्थ्यवान व सुधारलेल्या राष्ट्रांत हिंदुस्थानास उच्च व अभिमानास्पद पद प्राप्त करून देण्याकरितां, भाईहो!

**स्वराज्य मिळवा!**

१४०२

# स्वराज्यमार्गदर्शन

स्वराज्य हें अनेक देशहिताच्या बाबींचें केंद्रस्थान आ[illegible] हा सिद्धान्त लक्षांत घेऊन ज्या त्या विषयाच्या अधिकारी लेखकांनीं लिहिलेल्या सात आठ निबंधांचा एक भाग (पृ. सं. १२५-१५०) याप्रमाणें स्वराज्यमार्गदर्शनाचे कांहीं भाग प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे, व यासाठीं महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व विद्वान् लेखकांचें पाठबळ मिळालें असून आजपर्यंत सुमारे पन्नास लेखक व त्यांचे लेखनविषय निश्चित होऊन लेखनास सुरुवातहि झाली आहे. लोकमान्य टिळकहि एक उपोद्घातात्मक निबंध लिहीत आहेत. विशेष खुलाशाचें माहितीपत्रक ८॥. पाठवून मागवावें. प्रत्येक भागाची किंमत ८८ ट. ख. शिवाय.

धी प्रिंटिंग एजन्सी
प्रिंटर्स, बुकसेलर्स अँड पब्लिशर्स
पुणें-शहर.